
कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर


धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण


स्थापना १२ मे १९०९


शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर

पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार


**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine May 2024 - Pages - 52**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७५ * अंक ७ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




दि. ९ एप्रिल २०२४ रोजी कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त मुख्यालयातील कै. दादासाहेब केतकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे आणि संचालक श्री. आनंद कुलकर्णी, समवेत संचालक श्री. रमेश कुलकर्णी, रेक्टर श्री. प्रदीप पाटील आणि श्री. चंद्रहास बहिरट

## ❊ संस्था मुख्यालय – श्रीराम नवमी क्षणचित्रे ❊



दि. १७ एप्रिल २०२४ रोजी
श्रीराम नवमी निमित्त
संस्थेच्या श्री धनुर्धारी श्रीराम मंदिरातील
श्री राम लक्ष्मणाची पूजा करताना
देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर आणि
कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



श्रीरामाचे चरणी
कीर्तन सेवा सादर करताना
ह. भ. प. सौ. वत्सला रामभाऊ शिर्के,
तबला वादक श्री. आनंद अभ्यंकर
हार्मोनियमची साथ करताना
श्री. स्वानंद सचिन राजोपाध्ये



श्री राम लक्ष्मणास वंदन करताना
विश्रामबागवाडा पोलीस स्टेशन, पुणे येथील
वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. दीपाली भुजबळ,
समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे,
उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे आणि
संचालक श्री. सुनिल रेडेकर



श्रीराम जन्मोत्सव प्रसंगी
आयोजित कार्यक्रमासाठी उपस्थित
मान्यवर, देणगीदार श्रीमती गंगुताई व
सिंधुताई धामणकर, श्री. सदानंद केंघे,
वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. दीपाली भुजबळ
संचालक, प्राचार्य, सेवक आदी मान्यवर

संपादकीय

# आपला महाराष्ट्र

'हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला'

विरागी, वीतरागी आणि निर्मोही असलेल्या साक्षात् भगवान शंकराला जरी 'अस्ति उत्तरस्यां दिशि देवतात्मा' हिमालयाचा मोह पडत असला तरी,

'भव्य हिमालय तुमचा अमुचा
केवळ माझा सह्यकडा'

असेच मला म्हणावेसे वाटते.

विविधतेतही एकता जपणाऱ्या आणि जोपासणाऱ्या आपल्या भारत देशाप्रमाणेच आपला महाराष्ट्रदेश आहे. त्यामुळेच

'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा हा माझा श्री महाराष्ट्र देशा '

असेच सातत्याने म्हणावेसे वाटते.

आपला महाराष्ट्र वरवर पाहता जरी राकट, कणखर आणि दगडांचा देश असला तरी, अंतरंगी मात्र तो नाजूक, कोमल आणि दळदारी फुलांचा देश आहे. अंजन, कांचन करवंदीच्या वृक्षराजीचे इथे प्राबल्य असले तरी, हा महाराष्ट्र बकुळ आणि प्राजक्तासारख्या पुष्पवैभवाने मंडित आहे. वैभव आणि वैराग्याची सांगड घालणारा जरीपटका आणि समर्थ रामदास स्वामींचे भगवे निशाण या महाराष्ट्र भूमीत डौलाने फडकते आणि महाराष्ट्र देशाच्या वैभवाची साक्ष देते.

'सह्याद्रीची दगडी शीर' असलेला महाराष्ट्र भावभक्तीचा आणि बुध्दी व पराक्रमाचाही देश आहे. वर्षानुवर्षे थंडगार मातीच्या गोळ्याप्रमाणे पारतंत्र्यात खितपत पडलेल्या समाजमानसाला स्वातंत्र्यप्रेरणेने झपाटून टाकणाऱ्या छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने महाराष्ट्र देशाची अस्मिता जागी झाली. श्री शिवाजी महाराजांच्या या स्वातंत्र्यप्रेरणने आसेतुहिमाचल पसरलेल्या या देशात एक नवीन पहाट उमलली.

'मोडिली मांडिली क्षेत्रे', या श्री शिवछत्रपतींच्या लोकोत्तर कार्याने राष्ट्रजीवनाला एक नवी दिशा मिळाली.

'तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणी कोंडा
वहाण पायी, अंगी कांबळी, उशाखाली धोंडा,
विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात
इकडे कर्नाटक हासतसे तिकडे गुजरात
आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल,
इकडे इस्तंबूल थरारे तिकडे बंगाल'

भीमथडीच्या तट्टांना यमुनेचे पाणी पाजून स्वातंत्र्याची ज्योत मनामनात तेवविण्याचे कार्य श्री शिवछत्रपतींच्या रूपाने महाराष्ट्र देशाने केले. शिवरायांचा तोच वारसा मोठ्या अभिमानाने पुढे चालवताना, स्वातंत्र्य देवतेची उपासना आणि आळवणी करताना आधुनिक काळातील वि. दा. सावरकर म्हणतात,

'तुजसाठी मरण ते जनन,
तुजवीण जनन ते मरण,
तुज सकल चराचर शरण'

स्वातंत्र्यप्रेमी मानवी मनामुळेच समाजात राज्यसंवर्धन आणि कलासंवर्धन होते. त्यासंदर्भात कविवर्य गोविंदाग्रज आपल्या महाराष्ट्र गौरवात म्हणतात,

'ठायी ठायी पांडव लेणी सह्याद्रीपोटी
किल्ले सत्तावीस बांधले सह्याद्रीपाठी'

मानव हा एक समाजप्रिय प्राणी आहे. समाजाची व पर्यायाने आपली उन्नती करण्यासाठी तो सातत्याने धडपडत असतो. अशा समाज धुरीणांनी महाराष्ट्राची जडणघडण केली. मानवसमाजापुढे एक आदर्श आपल्या कर्तृत्वाने साकार केला. त्यातील अग्रणी म्हणजे छत्रपती शाहू, महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, गो. ग. आगरकर, गोपाळ कृष्ण गोखले, श्री. म. माटे, महर्षी कर्वे, पंडिता रमाबाई रानडे आदी मंडळी. त्यांनी महाराष्ट्राला जी एक सामाजिक आणि वैज्ञानिक दृष्टी दिली त्याचाच परिपाठ आजकालच्या काळात गाडगेबाबा, डॉ. बाबा आमटे आणि त्यांचा परिवार, डॉ. अभय बंग, सिंधूताई सपकाळ आदी मंडळी अंमलात आणून भावी पिढ्यांना प्रेरणा देत आहेत.

माणसाने कितीही भौतिक प्रगती केली तरी, जीवनात श्रेयप्राप्ती शिवाय अर्थ नसतो.

'जीवाचा जणू धर्मचि दिसतो जावे पुढे त्या पुढे' या मानवी सहजप्रवृत्तीने प्रत्येक जिवंत मनाच्या माणसाला जीवनात परिपूर्णतेची ओढ असते, आस असते. त्या ओढीतूनच महानुभाव पंथीय चक्रधर आणि सर्वसामान्य प्रापंचिकांना मुक्तीचा मार्ग खुला करून देणारे श्री संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आदी भागवत धर्मीय संत, तसेच संत रामदास यांनी जीवनात प्रवृत्ती आणि निवृत्तीची सांगड यशस्वीपणे कशी घालावी याची शिकवण दिली. तोच आध्यात्मिक वारसा आपल्या संस्थेचेच एक विद्यार्थी श्री श्रीधरस्वामी, श्री गुरूदेव रानडे, श्री. बेलसरे, श्री. बाबामहाराज सातारकर, श्री. सोनोपंत दांडेकर आदी मंडळींनी समाजमानसात रुजविण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या अभंग विचारधारेने आजही करीत आहेत.

भारताची आर्थिक राजधानी आणि शान असलेली आपल्या महाराष्ट्रातील मुंबई नगरी हा तर, प्रत्येक मराठी आणि महाराष्ट्रीयन माणसाचा मानबिंदूच आहे. भारत देश एक आर्थिक महासत्ता म्हणून प्रस्थापित करण्यात टाटा, बिर्ला, गोदरेज आदी उद्योजकांचा वाटा मोलाचा असला तरी, त्याचबरोबर किर्लोस्कर, वेलणकर, पारखे, ओगले आदी आद्य मराठी उद्योजकांचे योगदानही त्यात मोलाचे आणि महत्त्वपूर्ण आहे. या उद्योगक्षेत्रात आता अचला फडके - जोशी, तन्वी दंडवते, अबोली तेलवणे, परिका घोटीकर, आरती ताम्हणे आदी उद्योजक स्त्रियांचाही सिंहाचा वाटा आहे. म्हणूनच

'बहु असोत सुंदर संपन्न देश महा,<br>
प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा '

असेच या १ मे च्या महाराष्ट्रदिनी म्हणावेसे वाटते. आपणा सर्वांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा !

महाराष्ट्र दिनाच्या बरोबरच 'स्वेदगंगेचे' महात्म्य ओळखणाऱ्या सर्व कामगार बांधवानांही कामगार दिनानिमित्त मी शुभेच्छा देतो.

सर्व महाराष्ट्रीय जनता आणि माझ्या कामगार बांधवांच्या वाट्याला निरामय आणि सुखमय जीवन येऊ दे हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

जय हिंद ! जय महाराष्ट्र

## संस्था वर्धापन दिन शुभेच्छा

दिनांक १२ मे हा आपल्या संस्थेचा वर्धापन दिन.

त्यानिमित्त आदरणीय श्री. गोडबोले, श्री. कानेटकर, कुलगुरू दादासाहेब केतकर, शिक्षण महर्षी डॉ. अण्णासाहेब खैर आणि इतर संस्थापक यांच्या चरणी आम्ही संचालक मंडळातील सर्व सभासद विनम्र भावाने अभिवादन करतो आणि त्यांचा वैचारिक आणि सेवाभावी वारसा जोपासण्याचे व संस्था सातत्याने प्रगतीपथावर नेण्याचे बळ आम्हा प्राप्त होवो अशी त्यांच्या चरणी प्रार्थना करतो.

दि. २३ एप्रिल २०२४<br>
चैत्र पौर्णिमा, हनुमान जन्मोत्सव



## कुलगरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांची १३७ वी जयंती संपन्न

**संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

संस्थेचे कुलगुरु कै. विष्णु गंगाधर तथा दादासाहेब केतकर यांची १३७ वी जयंती मंगळवार दि. ९ एप्रिल २०२४ रोजी साजरी करण्यात आली. या दिवशी संस्थेच्या मुख्यालयाच्या आवारामधील कै. दादासाहेबांच्या पुतळ्यास उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे व संचालक श्री. आनंद कुलकर्णी यांचे हस्तेपुष्पहार अर्पण करुन कै. दादांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

या कार्यक्रम प्रसंगी संचालक श्री. आनंद कुलकर्णी आणि श्री. रमेश कुलकर्णी तसेच शिक्षक - शिक्षकेतर सेवक बंधू - भगिनी आणि संस्थेच्या आश्रम वसतिगृहातील विद्यार्थी उपस्थित होते. सर्वांनी कृतज्ञतापूर्वक कै. दादासाहेबांना जयंतीच्या निमित्ताने श्रध्दांजली अर्पण केली.

या प्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी दादासाहेबांच्या आठवणी व त्यांनी संस्था वाढीसाठी केलेले प्रयत्न या विषयी आश्रमस्थ विद्यार्थ्यांना माहिती दिली. ***

## तुमच्या मुलांचे शिक्षण

आजच्या शालेय शिक्षणात अनेक दोष आहेत, असे प्रत्येक जण म्हणतो; पण ते दूर करण्याची जबाबदारी मात्र कोणी घेत नाही. प्रत्येक जण तृतीय पुरुषी बोलतो. इतरांनी सुधारणा करावी. ''मला ही सुधारणा करता येईल, ती मी करतो आहे.'' असे म्हणणारे फार थोडे.

प्रचलित शिक्षणात अनेक गुणही आहेत, हे विसरून चालणार नाही. गुणांबरोबर दोष आले आहेत. ते दूर करण्याचा प्रयत्न आपापल्यापरी शाळांचे चालक व मुलांचे पालक यांनी केला पाहिजे.

यात मुला-मुलींच्या पालकांना काय काय करिता येईल ते पाहा-

आपल्या मुलांचे अक्षर सुधारण्याच्या कामी पालक प्रयत्न करू शकतील. दररोज नियमितपणाने जर पाच-दहा ओळी शुद्धलेखन आणि अक्षर लिहवून घेतले तर अक्षरात पुष्कळ सुधारणा होईल.

मुलांच्या पुस्तकांतून आजकाल आधुनिक कवींच्या सुन्दर सुन्दर कविता असतात. भोजनाचे वेळी किंवा अन्य सोयीच्या वेळी मुलांकडून कविता म्हणून घेण्याचा परिपाठ ठेवला तर पाठांतर कायम राहून वाणीही शुद्ध होईल.

इंग्रजी-मराठी-हिंदी-संस्कृत वाचन आणि शुद्धलेखन घेणे ही गोष्टही सामान्य शिक्षित पालकाला कठीण नाही. आठवड्यातून एक-दोन वेळी आणि सुट्टीत अधिक वेळ असा उपक्रम केल्यास झालेल्या अभ्यासाला पुष्कळच मदत होईल.

शालेय शिक्षणात व्यायाम, प्रार्थना, हस्तव्यवसाय इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश केलेला आहे. त्याला पालकांनी घरीही प्रोत्साहन दिले पाहिजे. आपल्या मुलांकडून नियमित व्यायाम करवून घेणे, नियमित प्रार्थना म्हणण्याचा परिपाठ ठेवणे, घरची व्यवहारिक कामे मुलांना सांगणे-हे पालकांनी करावयास पाहिजे.

शाळेच्या शिक्षणाला गृहशिक्षणाची जोड मिळाली तर तुमच्या मुलांच्या बाबतीत तरी शिक्षणातील काही दोष दूर केल्यासारखे होतील. आता दीड-दोन महिने सुट्टी आहे, या दृष्टीने कार्यक्रम आखून सुट्टीचा शिक्षणाकडे उपयोग करून घ्या.

**डॉ. ग. श्री. खैर (एप्रिल १९५६)**

## संस्थेच्या श्री धनुर्धारी राम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव साजरा

**संचालक श्री. कृष्णाजी कुलकर्णी**



संस्थेच्या दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे बुधवार दि. १७ एप्रिल २०२४ रोजी चैत्र शुध्द ९ ला (श्रीराम नवमी) श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी सकाळी ९ ते १०.३० या वेळेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचे शुभहस्ते श्रीराम - लक्ष्मणास पुरुषसूक्ताचे आवर्तन करून अभिषेक करण्यात आला. पूजा करुन, श्रीराम - लक्ष्मणास पुष्पहार अर्पण करुन, नेवैद्य दाखविण्यात आला आणि कुलगुरु कै. दादासाहेब केतकर यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.

याप्रसंगी ह. भ. प. सौ. वत्सला रामभाऊ शिर्के (कीर्तन विशारद) यांनी सकाळी ११ ते दुपारी १२.३० यावेळेत आपली कीर्तनसेवा प्रभू श्रीरामचे चरणी अर्पण केली. त्यांनी कीर्तनामध्ये रामायण व महाभारतातील दाखले देवून प्रभू श्रीरामाच्या जन्माची कथा सांगितली. 'श्रीराम जन्मला ग सखे, राम जन्मला' या भक्ती गीताने सारा आसमंत दुमदुमला.

ह. भ. प. सौ. वत्सला रामभाऊ शिर्के यांना कीर्तन प्रसंगी हार्मोनियमची साथ श्री. स्वानंद सचिन राजोपाध्ये यांनी केली. तर श्री. आनंद अभ्यंकर हे तबला वादक होते.

सर्व उपस्थित भक्तांनी श्रीराम लक्ष्मणास फुले अर्पण करून त्यांचा कृपाशीर्वाद घेतला. सर्वांना तीर्थ व सुंठवडा प्रसादाचे वाटप करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी व संचालक यांचे हस्ते कीर्तनकार व त्यांचे साथीदार यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेच्या देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर, श्रीमती सिंधुताई धामणकर तसेच श्री. सदानंद केंघे यांचा सत्कार शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. तसेच विश्रामबागवाडा पोलीस स्टेशन, पुणे येथील वरीष्ठ पोलीस निरिक्षक सौ. दिपाली भुजबळ यांनाही शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या रामजन्मोत्सवासाठी संस्थेचे देणगीदार, माजी विद्यार्थी, संस्था पदाधिकारी, संचालक, विविध विभागातील शिक्षक - शिक्षकेतर बंधू भगिनी, आश्रमस्थ विद्यार्थी व या परिसरातील रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हनुमान जयंती उत्साहात संपन्न

मंगळवार दि. २३ एप्रिल २०२४ रोजी हनुमान जयंती (चैत्र पौर्णिमा) निमित्त धनुर्धारी श्रीराम मंदिरातील हनुमान मूर्तीवर उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांचे हस्ते अभिषेक करून विधिवत् पूजा व आरती करून नेवैद्य दाखविण्यात आला. सर्व उपस्थितांना तीर्थ प्रसाद देण्यात आला. ***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

### अभिनंदनीय


श्री. ज्ञानेश्वर दाते

मंगळवार दि. २ एप्रिल २०२४ रोजी सहशिक्षक डॉ. ज्ञानेश्वर आनंदराव दाते यांना पुणे सार्वजनिक सभा यांच्या १५४ व्या वर्धापन दिनानिमित्त खासदार सौ. मेघाताई कुलकर्णी यांच्या हस्ते **'आदर्श शिक्षक पुरस्कार'** प्रदान करण्यात आला. या प्रसंगी पुणे सार्वजनिक सभेचे अध्यक्ष श्री. विद्याधरपंत नारगोलकर, कार्याध्यक्ष श्री. अनिल शिदोरे व मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम रु. १,५०१/- असे पुरस्काराचे स्वरूप होते. श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी पुरस्काराची मिळालेली रक्कम रु. १,५०१/- संस्थेच्या आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक फी साठी देणगी म्हणून दिली आहे.

**श्री. ज्ञानेश्वर दाते यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### एन. एम. एम. एस. परीक्षा निकाल

सन २०२३ - २४ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेस इ. ८ वी तील २६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

तसेच १) कु. दौंडकर जयेश जालिंदर २) कु. कोकितकर वेदांत नामदेव ३) कु. पवार प्रज्वल सोमनाथ ४) कु. पाचरणे चेतन रविंद्र ५) उंदरे ओंकार सुनिल ६) शिनगारे आर्यन श्रीराम ७) कु. सोनवणे शंतनू दीपक ८) वडघुले विक्रांत नानासो हे ८ विद्यार्थी सारथी महामंडळ माध्यमातून दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत. या विद्यार्थ्यांना इ. ९वी ते १२ वी पर्यंत दरवर्षी प्रत्येकी रु. ९,६००/- या प्रमाणे एकूण रु. ३८,४००/- शिष्यवृत्ती देण्यात येईल.

या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विभाग प्रमुख अध्यापिका सौ. सुनंदा भाईक, अध्यापिका सौ. सविता जगताप, अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन !

### महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात संपन्न

सोमवार दि. १५ एप्रिल २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती संयुक्त पध्दतीने उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य वि. पां. गावडे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य वि. पां. गावडे यांनी केले. अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिराव फुले या दोघांच्या कार्याची माहिती उपस्थितांना सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक - शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. या प्रसंगी सुंदर असे फलकलेखन अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांनी केले. अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी उपस्थितांचे आभार मानले.

***

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

### औद्योगिक भेटी

### ज्ञानाई सिटीपी

प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी ज्ञानाई सिटीपी या अत्याधुनिक प्लेट मेकिंग युनिटला औद्यागिक भेट दिली. ऑफसेट प्लेट मेकिंग मधील विविध तंत्रज्ञान आणि प्रक्रिया विद्यार्थ्यांना पहावयास मिळाली. या औद्यागिक भेटीचे संयोजन श्री. सागर बंडगर यांनी केले.

### पारख फ्लेक्सी पॅक प्रायव्हेट लिमिटेड

द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी यवत, ता. दौंड, जि. पुणे येथील पारख फ्लेक्सी पॅक या कंपनीस भेट दिली. या कंपनीमध्ये फ्लेक्सो ग्राफिक प्रिंटिंग पाऊच मेकिंग इत्यादी प्रक्रियांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी 'श्रीक्षेत्र रामदरा' या ठिकाणास भेट दिली. या भेटीचे संयोजन प्रा. श्री. रोशन चौधरी, प्रा. सौ. संध्या कुलकर्णी व श्री. सिद्धार्थ बाविस्कर यांनी केले होते.

### जागतिक महिला दिन

दि. ८ मार्च २०२४ रोजी संस्थेमध्ये जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. संस्थेमधील विद्यार्थिनींसाठी विविध खेळ व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. सौ. नेहा कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

### विभागीय क्रीडा स्पर्धा

ॲथलेटिक्स इंटर इंजिनिअरिंग डिप्लोमा स्टुडंट्स असोसिएशन डी टू झोन यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धांचे संयोजन महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेमार्फत करण्यात आले होते. धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळा फेक, भालाफेक, थाळीफेक इ. क्रीडा प्रकारांमध्ये 'डी टू झोन' मधील विविध महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. पुणे महानगरपालिकेच्या कैलासवासी बाबुराव सणस मैदान येथे स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धांचे संयोजन प्रा. श्री. शंकर शेळकंदे व श्री. विष्णू बोत्रे यांनी इतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने केले.

***

## निधन वार्ता



श्रीहरी जळूकर

**संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी, संचालक, देणगीदार, हितचिंतक, शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व श्री. श्रीहरी दत्तात्रेय तथा नानासाहेब जळूकर यांचे शनिवार दि. १३ एप्रिल २०२४ रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी दुःखद निधन झाले.**

**श्री. श्रीहरी जळूकर हे मूळचे जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील रहिवासी. लहानपणीच मातृछत्र हरपल्याने पुढील शिक्षणासाठी ते पूर्वीच्या अनाथ विद्यार्थी वसतिगृहात दाखल झाले. माधुकरी मागून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. संस्थेमध्ये अनेक पदांवर काम करीत असताना ते संस्थेचे संचालक झाले.**

**पुणे शहरातील संस्कृतचे एक ज्येष्ठ गाढे अभ्यासक असा त्यांचा नावलौकिक होता. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांचे नंतर संस्थेच्या मासिक समाचारचे संपादक म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. त्यांचे संपादकीय लेख अनेक वाचक मनापासून वाचत होते. त्यांना अनेक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते. पुणे महानगरपालिकेतर्फे 'जीवन गौरव पुरस्कार' देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले होते.**

**अशा या शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व असलेल्या ऋषीतुल्य व्यक्तिला संस्था पारखी झाली आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात संस्था सहभागी आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.** **

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. मीना राणे**
**पर्यवेक्षिक : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### समूह गायन स्पर्धा

दि. १ मार्च २०२४ रोजी मोठ्या गटातील काही निवडक विद्यार्थी - विद्यार्थिनींनी, बालशिक्षण शाळेतर्फे आयोजित केलेल्या आंतरशालेय गायन स्पर्धेत भाग घेतला. प्राथमिक विभागातील विद्यार्थिनी कु. हर्षदा खाडिलकर, इ. ३ री हिने या विद्यार्थ्यांना कॅसिनोवर साथ केली. या सर्व भाग घेतलेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. रेखा बाली यांच्या हस्ते पुस्तके आणि रंगपेटी देऊन प्रोत्साहना दिली.

### वार्षिक परीक्षा

पूर्व प्राथमिक विभागाच्या मोठ्या आणि छोट्या गटाची वार्षिक परीक्षा दि. १८ मार्च ते दि. २८ मार्च २०२४ या दरम्यान घेण्यात आली. शिशु गटाची परीक्षा दि. २० मार्च ते २८ मार्च दरम्यान घेण्यात आली.

## प्राथमिक विभाग

### राष्ट्रीय विज्ञान दिन

दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी विज्ञान दिनाची माहिती सौ. वैशाली डबीर यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

### वार्षिक शालेय प्रदर्शनाचे बक्षिस वितरण

दि. ५ मार्च २०२४ रोजी वार्षिक शालेय प्रदर्शनातील उत्कृष्ट प्रकल्प बनवून आणलेल्या विद्यार्थ्यांना पर्यवेक्षिका सौ. रेखा बाली यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

### महाशिवरात्र व जागतिक महिला दिन

दि. ७ मार्च २०२४ रोजी सौ. संज्योत दामले यांनी महाशिवरात्र व जागतिक महिला दिनाची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### माता पालकांसाठी इंग्रजी प्रशिक्षण वर्ग

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून प्राथमिक विभागाने पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या माता पालकांसाठी इंग्रजी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते. हा उपक्रम दि. १० एप्रिल ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत पूर्णपणे मोफत घेतला गेला.

### पालक प्रतिनिधी सभा व माता पालक सभा

दि. २३ मार्च २०२४ रोजी या शैक्षणिक वर्षातील शेवटची पालक प्रतिनिधी सभा व माता पालक सभा घेण्यात आली.

### वार्षिक परीक्षा

दि. २८ मार्च ते दि. ६ एप्रिल २०२४ या दरम्यान प्राथमिक विभागाच्या वार्षिक परीक्षा घेण्यात आली.

### होळी

दि. २६ मार्च २०२४ रोजी सौ. शारदा नागुल यांनी होळी या सणाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

### अभिनंदनीय

दि. ३ मार्च २०२४ रोजी घेण्यात आलेल्या पुणे मॅरेथॉनने आयोजित केलेल्या रन फॉर अ कॉज या शर्यतीत विद्यार्थी कु. वेद पडवळ इ. २ री ड याने सहभाग घेतला होता. कु. वेद याने ३ कि. मी. अंतर २० मिनिटात पार केले. विद्यार्थिनी कु. आद्या धांदरफळे इ. १ ली ब हिने महाराष्ट्र टाईम्स किड्स मॅरेथॉन आयोजित स्पर्धेत ७ ते १२ या वयोगटातंर्गत ३ कि. मी. अंतर पार केले.

### विज्ञान ऑलिम्पियाड स्पर्धा निकाल

विज्ञान ऑलिम्पियाड स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिळविले.

| विद्यार्थ्यांचे नाव | इ/तु |
|---|---|
| कु. स्वानंद पाठक | इ. २ री ड |
| कु. श्रीया खर्डेकर | इ. २ री ब |
| कु. अवनिश वाघमारे | इ. २ री ड |
| कु. जान्हवी नाईक | इ. ३ री क |

| | |
|---|---|
| कु. अभेद्य गायकवाड | इ. ३ री ब |
| कु. अन्वी धारणकर | इ. ३ री अ |
| कु. दर्श मड्डी | इ. ४ थी क |
| कु. वैष्णवी सावंत | इ. ४ थी इ |
| कु. वृविता ताकवले | इ. ४ थी इ |

**गणित ऑलिम्पियाड स्पर्धा निकाल**

गणित ऑलिम्पियाड स्पर्धेत इ. २ री मधील ९ विद्यार्थ्यांनी, इ. ३ री मधील १२ विद्यार्थ्यांनी, इ. ४ थी मधील १४ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक प्राप्त केले. प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ/तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. अवनिश वाघमारे | इ. २ री ड | प्रथम |
| कु. चार्वी हेडके | इ. २ री ब | द्वितीय |
| कु. स्वानंद पाठक | इ. २ री क | तृतीय |
| कु. आरव बाडेकर | इ. २ री इ | तृतीय |
| कु. आराध्या पाटील | इ. ३ री ड | प्रथम |
| कु. गौरांग पुणतांबेकर | इ. ३ री ड | द्वितीय |
| कु. अनुश्री केदारी | इ. ३ री ब | तृतीय |
| कु. वृविता ताकवले | इ. ४ थी इ | प्रथम |
| कु. अस्मि पुजारी | इ. ४ थी ड | द्वितीय |
| कु. आयुष सुतार | इ. ४ थी इ | तृतीय |

**इंग्रजी ऑलिम्पियाड स्पर्धा निकाल**

इंग्रजी ऑलिम्पियाड स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक मिखवले.

| विद्यार्थ्याचे नाव | इ/तु |
|---|---|
| कु. स्वानंद फाटक | २ री ड |
| कु. आरव वाडेकर | २ री इ |
| कु. वेद पडवळ | २ री ड |
| कु. कार्तिक माने | ३ री क |
| कु. अभेद्य गाकवाड | ३ री ब |
| कु. अनुश्री केदारी | ३ री ब |
| कु. गौरांग पुणतांबेकर | ३ री ड |
| कु. सौमित्र कुलकर्णी | ३ री क |
| कु. वृविता ताकवले | ४ थी इ |
| कु. गायत्री सावंत | ४ थी इ |
| कु. विहान उंबरककर | ४ थी ई |
| कु. वैष्णवी सावंत | ४ थी ई |
| कु. आयुष सुतार | ४ थी ई |

ऑलिम्पियाड स्पर्धेच्या द्वितीय स्तरावरील परीक्षेत खालील विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

**इंग्रजी ऑलिम्पियाड**

| | |
|---|---|
| कु. कार्तिक माने | इ. ३ री क |
| कु. वृविता ताकवले | इ. ४ थी इ |

**विज्ञान ऑलिम्पियाड**

| | |
|---|---|
| कु. जान्हवी नाईक | इ. ३ री क |
| कु. दर्श मड्डी | इ. ४ थी क |

**गणित ऑलिम्पियाड**

| | |
|---|---|
| कु. आराध्या पाटील | इ. ३ री ड |
| कु. वृविता ताकवले | इ. ४ थी इ |

**नवीन उपक्रम**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने व सुजाण पालकत्व कसे असावे यासाठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या समुपदेशिका सौ. मृणाल देशमुख या मार्गदर्शक चित्रफीत तयार करतात. ही चित्रफीत आठवड्याच्या प्रत्येक शनिवारी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना पाठवण्यात येते. यामुळे पालक व पाल्य यांच्या नात्यातील ताण तणाव कमी होण्यास मदत होते.

## माध्यमिक विभाग

**स्पर्धा परीक्षा**

इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी दि. २५ फेब्रुवारी २०२४ 'हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा' आणि ३ मार्च २०२४ रोजी 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठ' गणित या विषयाची परीक्षा घेण्यात आली.

**मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न**

दरवर्षी दि. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन व दि. २८ फेब्रुवारी हा दिवस विज्ञानदिन म्हणून साजरे केले जातात. दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी शाळेच्या असेंब्लीमध्ये हे दोन्ही दिवस साजरे

करण्यात आले. विद्यार्थ्यांनी मराठी दिन व विज्ञान दिनाचे महत्त्व, भाषणे व गाण्यांद्वारे सादर केले.

**नेचर वॉक**

दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी इ. ६वी ते इ. ८ वी च्या नेचर क्लबच्या विद्यार्थ्यांसाठी 'सिपना एक मानवनिर्मित जंगल' येथे 'नेचर वॉक' हा उपक्रम आयोजित केला होता. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी भारतातील विविध भागांतील झाडे आणि वनस्पतींची विविधता पाहिली.

**इ. १२ वी आणि इ. १० परीक्षा केंद्र**

मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय हे इ. १० वी आणि १२ वी च्या बोर्डाच्या परीक्षेचे केंद्र होते.

**स्वच्छ वर्ग स्पर्धा २०२३ - २४**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध स्पर्धा व उपक्रम राबविण्यात येतात. अशीच एक स्पर्धा म्हणजे स्वच्छ वर्ग स्पर्धा २०२३ - २४. या वर्षीचा चषक प्राचार्या सौ. मीना राणे यांच्या हस्ते विजेत्या वर्गांच्या विद्यार्थ्यांना देण्यात आला. या वर्षी अनुक्रमे इ. ५वी, इ. ६ वी, इ. ६ वी ब, इ. ८ वी ड आणि इ. ९ वी इ या वर्गांना हा चषक देण्यात आला. या वर्गाच्या वर्गशिक्षिका सौ. माधुरी शिंदे, सौ. स्वाती पाठक, सौ. सुजाता मोरे, कु. अनुपमा कर्वे आणि सौ. दीपाली केळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**नेचर क्लब**

दि. १६ मार्च २०२४ रोजी इ. ६ वी ते इ. ८ वी च्या नेचर क्लब च्या विद्यार्थ्यांसाठी 'एक कुटुंब एक झाड' हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याला एक रोप देण्यात आले.

**पुरंदरे ट्रेकचे आयोजन**

दि. १७ मार्च २०२४ रोजी इ. ८वी व ९ वीच्या एन सी सी आर्मी आणि एअर विंग कॅडेटसाठी पुरंदर किल्ला ट्रेक आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्री. उमेश देशपांडे, सौ. अनिता गायगोळे, सौ. श्रुती कांबळे, श्री. हर्षद मोघे या शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

**वार्षिक परिक्षा**

इ. ५ वी ते इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा दि. २३ मार्च ते ६ एप्रिल २०२४ पर्यंत आयोजित करण्यात आली होती.

**पालक सभा**

दि. २३ मार्च २०२३ रोजी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाची शिक्षक - पालक प्रतिनिधी आणि शिक्षक माता पालक प्रतिनिधी सभा घेण्यात आली. या सभेस सर्व वर्गशिक्षक व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. शाळेला मिळालेल्या शासकीय परिपत्रकानुसार नवीन शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ पासून इ. ७ वी ते इ. १० वी ची शाळा सकाळच्या सत्रात भरविली जाईल. तसेच इ. ५ वी व ६ वीची शाळा प्राथमिक विभागाबरोबर दुसऱ्या सत्रात भरविण्यात येईल असे सांगण्यात आले. यावेळी प्राचार्या सौ. मीना राणे यांनी पालकांशी संवाद साधला.

**कार्यशाळेमध्ये सहभाग**

शिक्षिका सौ. प्राची कोल्हटकर या कामगार कायदा प्रॅक्टिशनर्स असोसिएशने आयोजित केलेल्या कार्यशाळेस उपस्थित होत्या. यामध्ये कौशल्य विकास कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा आदी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

**माझी शाळा सुंदर शाळा अभियान**

मुख्यमंत्र्याच्या माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात भाग घेतला होता. या अंतर्गत शाळेत चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, स्वच्छ वर्ग स्पर्धा असे विविध उपक्रम घेण्यात आले.

**अभिनंदनीय**

* दि. ३ मार्च २०२४ रोजी एन. डी. ए. गेट, पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेत विद्यार्थी कु. ऑस्टीन नवगिरे इ. ८ वी इ याने दोन सुवर्ण पदके प्राप्त केली. तसेच विद्यार्थी कु. सक्षम नाईक इ. ७ वी ड याला एक रौप्य पदक मिळाले. कु. ऑस्टीन याची किकबॉक्सिंगच्या राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धेसाठी निवड झाली.

* दि. ३ मार्च २०२४ रोजी सेंट विन्सेंट ॲथलेट मीट

२४ तर्फे झालेल्या १०० मी धावणे या स्पर्धेत विद्यार्थी कु. सूर्यवर्धन पाठारकर इ. ६ वी ड याने तिसरा क्रमांक मिळविला.

✻ दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी लातूर येथे झालेल्या मेट्रो अबॅकस राष्ट्रीय स्पर्धेत विद्यार्थिनी कु. आयुषी शिरकांडे इ. ७ वी इ हिला प्रथम क्रमांक मिळाला. कु. आयुषी शिरकांडे हिला सुवर्ण पदक आणि स्मृतिचिन्ह मिळाले.

✻ भारतभर विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान भारत तिबेट सहयोग मंचातर्फे दरवर्षी करण्यात येतो. या मंचातर्फे दिला जाणारा स्त्री शक्ती सन्मान पुरस्कार शिक्षिका सौ. श्रद्धा लाके यांना दि. १३ मार्च २०२४ रोजी प्रदान करण्यात आला. सौ. श्रद्धा लाके यांना शाल, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

**उच्च माध्यमिक विभाग**

**अभिनंदनीय**

दि. २२ फेब्रुवारी २०२४ रोजी 'शिक्षण विवेक' आणि 'मुकुंद भवन ट्रस्ट' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मराठी प्रश्नमंजुषा स्पर्धेत मराठी विषयाच्या सहाय्यक शिक्षिका सौ. मंजिरी मिलिंद पाटणकर यांनी खुल्या गटातून पारितोषिक मिळवले. सौ. मंजिरी मिलिंद पाटणकर यांना सुवर्णपदक आणि प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

**सर्व यशस्वी शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन !** ✻✻✻

**✻ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ✻**



सन २०२३ - २४ या वर्षीच्या 'स्वच्छ वर्ग' स्पर्धेतील विजेते पदाचा चषक स्वीकारणारे इ. ५ वी इ, ६ वी इ, इ. ७ वी ब, इ. ८ वी ड, इ. ९ वी इ चे विद्यार्थी



इ. ६ वी ते ८ वी नेचर क्लब आयोजित 'एक कुटंब एक झाड' या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला एक रोप देण्यात आले.

## कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

### महाविद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

दि. २४ फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयामध्ये ''आरोहन २०२४''(व्हिजन टूवड्‌र्स सक्सेस) हा स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पुणे विद्यार्थी गृहाच्या दादासाहेब केतकर सभागृहात उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रतीक सुराणा (आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट प्रशिक्षक) उपस्थित होते. त्यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, प्रा. राजेंद्र कडुसकर, श्री. रमेश कुलकर्णी, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, आई क्यू ए सी को-ऑर्डिनेटर डॉ. स्वाती जोशी, विद्यार्थी प्रतिनिधी मुस्कान बेहलिम, मंदार नाईक व महाविद्यालयाचा जनरल सेक्रेटरी कु. धीरज जगदाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सर्वप्रथम प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून पाहुण्यांचा परिचय दिला. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी इतर मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. प्रतीक सुराणा यांनी विद्यार्थ्यांना कष्ट, जिद्द, चिकाटी असेल तर, तुम्ही नक्कीच यशाच्या उत्तुंग शिखरावर पोहोचाल असे प्रेरक प्रोत्साहन दिले. संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांनी विद्यार्थ्यांना 'पॅकेजच्या मागे न लागता एक यशस्वी उद्योजक बना' असा उपदेश केला. उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते गुणवंत तसेच अभ्यासाभिमुक उपक्रम म्हणजेच पोस्टर कॉम्पिटिशन, थ्रीडी लोगो मेकिंग कॉम्पिटिशन, मेहंदी, रंगोली, टॅलेंटेक्स, वेब विझार्ड तसेच विविध क्रीडा स्पर्धा क्रिकेट, कबड्डी, बॅडमिंटन, चेस, कॅरम, डॉजबॉल, बास्केटबॉल, रनिंग, व्हॉलीबॉल या स्पर्धांमधील विजेत्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर सेवकांनी आपआपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे पार पाडल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका ज्योती पाटील, स्नेहल जाधव व विद्यार्थ्यांतर्फे कु. यश कसबे व कु. आर्या जाधव यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती

दि. २३ जानेवारी २०२४ रोजी ग्रंथालय विभागात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. ग्रंथालय विभागप्रमुख प्राजक्ता लोकूर यांनी सर्वांचे स्वागत केले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे जीवन आणि देशासाठी त्यांनी दिलेले बलिदान आजही कसे प्रेरणादायी आहे, हे सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### रक्तदान शिबिराचे आयोजन

दि. २४ जानेवारी २०२४ रोजी कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स आणि आर. जी. घोलप ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरास संभाजी पाटील (सहयोगी संपादक, दै. सकाळ) यांची विशेष उपस्थिती लाभली. विज्ञान विभागप्रमुख सहाय्यक प्राध्यापक महादेव पिसाळ, सहाय्यक प्राध्यापिका प्रियांका खुटवड, सुप्रिया पंडित, उर्मिला पाटील आणि शेषेराव शिंगटे यांचे सहकार्य लाभले. या शिबिरात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच ६० विद्यार्थ्यांनी रक्तदान करून 'रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान' असा जनसंदेश दिला. एकंदरीतच या शिबिरास विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांचा उत्साही सहभाग नोंदविला गेला.

## अतिथी व्याख्यान

❊ दि. २४ जानेवारी २०२४ रोजी बीबीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी कु. सोनाली झेडम यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी 'आंतरराष्ट्रीय व्यापार' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना 'नोकरीच्या मागे न लागता व्यवसायभिमुख व्हा' असा कानमंत्र दिला. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव निटवे यांनी केले. कार्यक्रमाची प्रस्तावना सहाय्यक प्राध्यापिका काजल जगताप व पाहुण्यांचा परिचय सहाय्यक प्राध्यापिका माया उंबरकर यांनी केला तर आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका माधुरी साळी यांनी केले.

❊ दि. ९ फेब्रुवारी २०२४ रोजी वाणिज्य विभागामधील विद्यार्थ्यांसाठी 'आर्थिक साक्षरता'' या विषयावर मा. डॉ. धोंडीबा बोरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. डॉ. धोंडीबा बोरकर यांनी वरील विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही उत्साही सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव निटवे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक प्राध्यापिका काजल जगताप यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सहाय्यक प्राध्यापिका माया उंबरकर यांनी करून दिला. आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका माधुरी साळी यांनी केले.

❊ दि. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'एक्स्पेक्टेशन बाय स्मॉल इंडस्ट्रीज् फ्रॉम कॉमर्स अँड मॅनेजमेंट स्टडीज्' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून मा. डॉ. अशोक मोजड उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत डॉ. मोजड यांनी वरील विषयाला अनुसरून विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही वाढविला. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. ज्ञानदेव निटवे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक प्राध्यापिका काजल जगताप व पाहुण्यांचा परिचय सहाय्यक प्राध्यापिका माया उंबरकर यांनी करून दिला. आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका माधुरी साळी यांनी केले.

❊ दि. ६ मार्च २०२३ रोजी सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंदांसाठी 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' कसे अंमलात आणावे या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अतिथी म्हणून प्रोफेसर शकीला सिद्धवतम् (विभाग प्रमुख, आबेदा इनामदार कॉलेज) उपस्थित होत्या. नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करत असताना उद्‌भवणाऱ्या अडचणी व त्यांचे निरसन कसे करावे यासंदर्भात त्यांनी बहुमोल मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला सर्व शिक्षक व सेवक वृंद उपस्थित होता. अतिथींचे स्वागत प्राध्यापिका डॉ. स्वाती जोशी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी केले.

❊ दि. ९ मार्च २०२४ रोजी श्री. नितीन बोरगे (सीनियर सोल्युशन आर्किटेक्ट, कॅप जेमिनी) यांचे तृतीय वर्ष बी.एस.सी. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी 'रेस्ट ए.पी.आय अँड मायक्रो सर्विसेस' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. रेस्ट एपीआय वापरून, विकासकर्त्यांना अनेक संदर्भात डेटा अँड सेवा संचालन करण्याची क्षमता मिळते. मायक्रोसर्व्हिसेस वापरून विद्यार्थ्यांना प्रणाली विकसित करण्याचा अधिक सोपा, सुरक्षित आणि स्थायी उपाय मिळतो. ही दोन्ही तंत्र विद्यार्थ्यांना अध्ययन, प्रयोग आणि प्रोजेक्ट्‌समध्ये अधिक सहाय्य करतात. यासंदर्भात विद्यार्थ्यांना नितीन बोरगे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन सहाय्यक प्राध्यापक प्रशांत देशमुख यांनी केले तर पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे विज्ञान विभागप्रमुख सहाय्यक प्राध्यापक महादेव पिसाळ यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी केले.

## जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

दि. ८ मार्च २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयांमध्ये दोन उपक्रम राबविण्यात आले.

दि. १६ मार्च २०२४ रोजी विद्यार्थिनी व महिला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'सेल्फ डिफेन्स फॉर गर्ल स्टुडन्ट' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विठ्ठल शेंडगे (तायक्वांदो ट्रेनर) यांनी काही प्रात्यक्षिके दाखवून वरील विषयाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमाचे आयोजन व आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका अजिता बोकील यांनी केले.

दि. १९ मार्च २०२४ रोजी 'How these women became leader' या विषयाचे मा. श्री. विभाकर रामतीर्थकर यांचे ऑनलाइन गेस्ट लेक्चर आयोजित करण्यात आले होते. मुलींच्या सामाजिक, आर्थिक आणि मानसिक संघर्षामध्ये यशस्वी स्त्रियांची भूमिका ही सर्वांच्या दृष्टीने कशी महत्त्वाची आहे, हे श्री. रामतीर्थकर यांनी पटवून दिले. कार्यक्रमाचे आयोजन व प्रस्तावना सहाय्यक प्राध्यापिका स्नेहल जाधव यांनी केली तर, आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका उर्मिला पाटील यांनी केले.

## कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन

मार्च २०२४ मध्ये 'ट्रेनिंग अँड प्लेसमेंट' विभागातर्फे तृतीय वर्ष (संगणक), एम्. एस्. सी. (कॉम्प्युटर सायन्स) व एम्. एस्. सी. (कम्प्युटर ॲप्लीकेशन) विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'कौशल्य विकास कार्यक्रमाचे' आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत इंडस्ट्रीच्या गरजेप्रमाणे मूल्यवर्धित कोर्सेसच्या माध्यमातून अतिरिक्त कौशल्य प्राप्त करून नवीन तंत्रज्ञान, टूल्स, पद्धतींशी विद्यार्थ्यांची ओळख करून देण्यात आली. याचा फायदा नोकरी, नोकरी स्थानीयकरण तसेच विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी होईल, यासाठी इंडस्ट्री एक्सपर्ट कडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.

## महाविद्यालय व वंचित विकास यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेले उपक्रम

### प्राणी पक्षांसाठी दाणा-पाणी उपक्रमाचे आयोजन

उन्हाचा वाढता चटका लक्षात घेता माहे एप्रिल २०२४ मध्ये महाविद्यालय आणि वंचित विकास यांच्या संयुक्त विद्यमाने प्राणी पक्षांसाठी दाणा-पाणी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून ''प्राणी वाचवा, पक्षी जगवा'' हा संदेश पोहोचविण्यात आला. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड व वंचित विकासच्या श्रीमती तेजस्विनी थिटे यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात विद्यार्थ्यांना पर्यावरण व त्यातील प्रत्येक प्राणी पक्षी जीवाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. वाढता उन्हाळा लक्षात घेता आपल्या परिसरातील तहानलेल्या या चिमुकल्या जीवांसाठी दाणा-पाणी ठेवण्यासाठी १०० मातीची भांडी महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना देण्यात आली. या उपक्रमास महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंद तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

### आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी माहे एप्रिल २०२४ मध्ये आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात ५०० विद्यार्थीनी व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिरात वजन, उंची, रक्तदाब, कान, नाक, घसा, दात, डोळे, विद्यार्थिनींच्या पाळी समस्या, त्वचेचे प्रश्न, पोटाच्या तक्रारी आदींची तपासणी डॉक्टरांकडून करण्यात आली. भारती हॉस्पिटलच्या आयुर्वेद विभागाचे डॉ. शितल पाटील व डॉ. गजानन पाटील यांच्यासह डॉ. शुभम विसपुते, डॉ. रोहित यादव, डॉ. प्रतीक उगले, डॉ. नितीश गुप्ता, स्वयंसेवक प्रसाद गोंदकर यांनी आरोग्य सेवा दिली. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड व वंचित विकासच्या श्रीमती तेजस्विनी थिटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे आयोजन शारीरिक शिक्षण संचालक विवेक झेंडे यांनी पार पाडले. प्राचार्य डॉ.

संजयकुमार गायकवाड यांच्या मते आगामी काळात वंचित विकासच्या सहकार्याने महाविद्यालयात पर्यावरण शिक्षण, महिला सक्षमीकरण, स्त्री- पुरुष समानता, मुलांचे समुपदेशन, कार्यशाळा आदी उपक्रम राबविले जाणार आहेत, तसेच युवा पिढीला समाजप्रती भान असावे, समाजासाठी त्यांनी योगदान द्यावे, त्याचा अभ्यास व अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी हे उपक्रम उपयुक्त ठरतील. ✻✻✻

## ✻ कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, पुणे ९ ✻




महाविद्यालय आणि 'आर. जी. घोलप ब्लड बँक' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना विद्यार्थी या प्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड आदी मान्यवर



'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' **NEP 2020** कसे अंमलात आणावे या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळाप्रसंगी व्याख्यात्या प्रोफेसर शकीला सिद्धवतम (विभाग प्रमुख, आबेदा इनामदार कॉलेज) यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्राध्यापिका डॉ. स्वाती जोशी



महाविद्यालय आणि वंचित विकास यांच्या संयुक्त विद्यमाने प्राणी पक्षांसाठी दाणा-पाणी उपक्रमातंर्गत वंचित विकासच्या श्रीमती तेजस्विनी थिटे यांना प्रातिनिधिक स्वरूपात मातीचे भांडे देताना प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड



आरोग्य तपासणी शिबिर प्रसंगी भारती हॉस्पिटलच्या आयुर्वेद विभागाचे डॉक्टर यांच्यासमवेत सेवक वर्ग

# विद्याभवन-घाटकोपर, मुंबई शाखा

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी विभाग,

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी), श्रीमती पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### नैसर्गिक रंगांची होळी

शुक्रवार दि. २२ मार्च २०२४ रोजी पूर्व प्राथमिक, सेमी इंग्रजी आणि इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी होळीनिमित्त नैसर्गिक रंगांची उधळण केली. नैसर्गिक रंगांची होळी खेळा, बाहेरचे अन्न टाळा, असे आवाहन शाळेकडून विद्यार्थ्यांना करण्यात आले.

होळी उत्सवात मुलांसोबत त्यांचे पालकदेखील उपस्थित होते. होळीला शेवबुंदी व पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून होळीचे दहन केले. पूर्व प्राथमिक इंग्रजी विभाग समन्वयक श्रीमती शुभांगी जाधव, समन्वयक श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन्, पूर्व प्राथमिक इंग्रजी विभाग पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया, पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभाग पर्यवेक्षिका श्रीमती सिध्दी साळवी, शिक्षिका श्रीमती नेहा कर्णिक व दोन्ही विभागाचे शिक्षक उपस्थित होते. होळी खेळताना रासायनिक रंगांचा वापर टाळा, असे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

### गुढीपाडवा

प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी विद्याभवन संकुलात गुढी उभारली. अनुसंधान समिती सदस्य प्राचार्य कृ. ना. शिरकांडे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील आणि मराठी माध्यमिक विभागाच्या प्राचार्या श्रीमती योगिनी पोतदार, समन्वयक श्रीमती शुभांगी जाधव, श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन्, पर्यवेक्षिका श्रीमती सिध्दी साळवी, श्रीमती पूजा फरीया आणि दोन्ही विभागाच्या शिक्षकांनी गुढीची शास्त्रशुध्द पध्दतीने पूजा केली. श्रीमती सिध्दी साळवी यांनी विद्यार्थ्यांना गुढीपाडव्याची माहिती विशद करून गुढीचे महत्त्व समजावून सांगितले. या वेळी विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी व प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश कणसे**

### निपुणोत्सव

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित निपुण भारत अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विकसित होण्यासाठी तालुका व जिल्हा स्तरावर निपुणोत्सव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये **पुणे विद्यार्थी गृह प्राथमिक इंग्रजी शाळेने शैक्षणिक साहित्याचे सादरीकरण करुन तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवला व जिल्हास्तरीय फेरीत त्यांची निवड करण्यात आली.** या उपक्रमामध्ये इ. ४ थीचे विद्यार्थी व सहा.शिक्षिका श्रीमती रेश्मा पैलकर आणि श्रीमती स्वप्ना गायकवाड सहभागी झाले होते.

### अबॅकस राष्ट्रीय स्पर्धा

VES अबॅकस राष्ट्रीय स्पर्धा २०२३-२४ मध्ये यशस्वी विद्यार्थ्यांच्या नावाची घोषणा करताना आम्हाला मनापासून आनंद होत आहे.

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|
| कु. सान्वी पाटील | ३री |
| कु. ओम दळवी | ४थी |
| कु. सर्वंभ पवार | ३री |
| कु. निहाली बोगाडे | ४थी |
| कु. श्रुती गिरी | ४थी |

श्रीमती रुपल शेट्टी दर शनिवारी शाळेच्या वेळे व्यतिरिक्त आणि रविवारी अबॅकसचे वर्ग चालवतात.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल भालचंद्र पाटील**

### अमेरिकन कॉन्स्युलेट भेट

गुरुवार दि. २८ मार्च २०२४ रोजी C. 49, G Block, Bandra Kurla Complex, Opp. Gate 18, 010 Convention Centre, Behind Trident Hotel, Bandra (E) या ठिकाणी आपल्या विद्याभवन हायस्कूल नं. १ या शाळेतून इ. ९वी चे १८ विद्यार्थी व श्री. रमेश सुखदेव घाडगे आणि सौ. संगिता श्रीनिवास साळी या दोन शिक्षकांनी अमेरिकन कॉन्स्युलेटला भेट दिली.

सकाळी ११.०० वाजता तेथे पोहचल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना एका सभागृहात Sustainability व Global Warming याबाबत व्याख्यान दिले. PPT च्या मदतीने माहिती देण्यात आली. याच बरोबर सर्व विद्यार्थ्यांना सौर उर्जेवर चालणारे किट देऊन त्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी स्वतः या कृतीमध्ये आनंदाने सहभाग घेतला. ग्रंथालयातील पुस्तकांचे आवडीने वाचन केले.

विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. दुपारी २.३० वाजता सर्व विद्यार्थ्यांना शाळेतून घरी सोडण्यात आले. विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक क्षेत्र भेटीचा अतिशय आनंद घेतला.

### NMMS परीक्षा निकाल

भारत सरकारतर्फे इ. ८वी तील राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या NMMS परीक्षा २०२३-२४ या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्याभवन हायस्कूल सेमी इंग्रजी माध्यमातील एकूण ११ व विद्याभवन हायस्कूल नं. २ माध्यमातील एकूण ६ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवून विद्याभवनच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. या शिष्यवृत्ती प्राप्त प्रत्येक विद्यार्थ्याला शासनातर्फे इ. ९वी ते इ. १२ वी पर्यंत दरवर्षी रु. १२,०००/- याप्रमाणे एकूण रु. ४८,०००/- शिष्यवृत्ती मिळते.

विद्याभवन हायस्कूल सेमी इंग्रजी माध्यमातील शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे :

१. कु. कारंडे साई नवनाथ
२. कु. तांबे धनश्री प्रकाश
३. कु. कदम सार्थक प्रमोद
४. कु. शिंदे अनुष्का बाळकृष्ण
५. कु. मेने पार्थ अशोक
६. कु. घाणेकर पूर्वा संतोष
७. कु. गावडे अमर शिवाजी
८. कु. लोलगे नयन प्रकाश
९. कु. नारायणकर अथर्व दीपक
१०. कु. मगदूम वीर प्रकाश
११. कु. खामकर श्रेया महेंद्र

विद्याभवन हायस्कूल नं. २ माध्यमातील शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे :

१. कु. सादये अमृता सुनिल
२. कु. हांडे वेदांत संदीप
३. कु. कोकळे यश संतोष
४. कु. वाल्मिकी वीर बीजू
५. कु. दबडे कोमल बापूसाहेब
६. कु. मोर्डेकर श्रावणी अजित

### डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा

होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ ची विद्यार्थिनी कु. त्रिशा नितीन गुंजाळ हिने तिच्या ॲक्शन रिसर्च प्रोजेक्ट आणि मुलाखतीची तिसरी फेरी यशस्वीरीत्या पार केली. तिच्या प्रकल्पाची मध्यवर्ती कल्पना फॅशन आणि पर्यावरण ही होती, आणि विषय 'पेंटेड फेसेस, हिडन कॉस्ट' हा होता. दि. ७ एप्रिल २०२४ रोजी तिला बालवैज्ञानिक म्हणून रौप्य पदक आणि रोख रु. २०००/- चे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कु. त्रिशा नितीन गुंजाळ हिस सहा. शिक्षिका सौ. अनुराधा वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा!**

## विद्याभवन संकुल

### शिक्षक परिसंवाद

मंगळवार दि. २३.४.२०२४ रोजी शिक्षकांसाठी एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाचे मुख्य व्याख्याते सन्मा. प्रा. श्यामकांत हनुमंत अत्रे (निवृत्त प्राचार्य, आचार्य आणि मराठे महाविद्यालय चेंबूर) हे होते. या प्रसंगी संस्थेचे हितचिंतक श्री. गिरीश जोशी, सर्व विभाग प्रमुख, उपमुख्याध्यापक आणि सर्व विभागातील शिक्षकवृंद उपस्थित होते. प्रा. अत्रे यांचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. श्रीमती मीनल भोळे यांनी त्यांचा समर्पक परिचय करून दिला. प्रा. अत्रे यांनी प्रथम सर्वांना जागतिक पुस्तक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शिक्षकांशी संवाद साधताना प्रत्येक शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून स्वतःसाठी काही प्रश्न तयार करावेत, त्यामध्ये आपले अवांतर वाचन, विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी नवीन काही माहिती देणे अथवा त्यांच्यासाठी नवीन उपक्रम राबवणे, चांगला माणूस घडविण्यासाठीचे प्रयत्न करणे, अभ्यासाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना आपण काय देऊ शकतो? अशा विविध प्रश्नांवर स्वतःला पडताळून पहावे. ज्या ठिकाणी कमतरता असेल त्यावर काम करावे म्हणजे चांगले शिक्षक तयार होतील आणि विद्यार्थी त्यांना स्मरणात ठेवतील. शाळेची व्याख्या म्हणजे शाळा ही चांगला माणूस घडविण्याची प्रयोग शाळा आहे. त्यासाठी नाविन्यपूर्ण प्रयोग करत राहावेत. पारंपरिक गोष्टींचे अंधानुकरण न करता बदलांशी सांगड घालावी व बदल घडवून आणावेत. तसेच नवीन शैक्षणिक धोरण (NEP) बद्दल बोलतांना सध्या असलेल्या शैक्षणिक पध्दतीत भारतीय सांस्कृतिक-सामाजिक व्यवस्थेनुसार ही बदलाची सुरुवात असून ती व्यवस्थित लागू केल्यास निश्चित फलदायी होईल अशी ग्वाही प्रा. अत्रे यांनी दिली. प्रा. अत्रे यांनी स्वतः राबवलेल्या काही उपक्रमांची चर्चा केली. त्यानंतर शेवटी माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी उपस्थित मान्यवर व सर्व शिक्षकवृदांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता चहापानाने झाली.

### योग शिबिर

दि. १५.४.२०२४ ते दि. २७.४.२०२४ पर्यंत सेमिनार हॉलमध्ये सकाळी ७.१५ ते ८.१५ वाजेपर्यंत शिक्षकांसाठी योगाचे शिबिर आयोजित केले होते. प्रशिक्षक म्हणून श्रीमती विनया कामत व श्रीमती जयश्री करंजकर यांनी मार्गदर्शन केले. सर्व शिक्षक या उपक्रमात सहभागी झाले होते. दि. २७.४.२०२४ रोजी या शिबिराची सांगता करण्यात आली.

***

**❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊**



**प्रमुख पाहुणे श्री. श्यामकांत अत्रे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना माध्यमिक मराठीच्या प्राचार्या श्रीमती योगिनी पोतदार**



**मा. प्रशिक्षक श्रीमती विनया कामत आणि श्रीमती जयश्री करंजकर यांचे स्वागत करताना माध्यमिक मराठीच्या उपप्राचार्या श्रीमती ज्योती देसाई**

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

### महाविद्यालयास ''नॅक मूल्यांकनात अ श्रेणी'' मिळाल्यामुळे गुणगौरव सोहळा संपन्न

महाविद्यालयास ''नॅक मूल्यांकनात अ श्रेणी'' मिळाल्यामुळे गुणगौरव सोहळा संपन्न झाला. प्रमुख पाहुण्या देणगीदार श्रीमती गंगुताई धामणकर यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. राजेंद्र कडुसकर, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, संचालक श्री. अमोल जोशी, संचालक श्री. सुनील रेडेकर आणि प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, प्राचार्य डॉ. संजय वाघचौरे, प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, मुख्यधापिका भारती पाटील आणि सौ. प्रतिमा वैद्य, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते.

कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी आपल्या भाषणात ज्या महाविद्यालयास 'अ' किवा 'अ++' मानांकन असेल अशा महाविद्यालयाचा दर्जा समाजाच्या दृष्टीने चांगला आहे, हे सिद्ध होते. 'अ' दर्जा मिळाला ही आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. एखाद्या उंचीवर पोहचणे सहज शक्य असते परंतु त्या उंचीवर आपले स्थान कायम राखणे कठीण असते. 'अ' दर्जा मिळवण्यासाठी तुम्ही जेवढे प्रयत्न केले, त्यापेक्षा अधिक प्रयत्न ते टिकवण्यासाठी करावे लागतील.

पुणे विद्यार्थी गृह ही संस्था नसून ती एक संस्कृती व एक कुटुंब आहे आणि तुम्ही त्याचे सदस्य आहात. त्याचप्रमाणे वेन्डर,पालक, ठेकेदार आणि विद्यार्थी यांचे देखील फार मोठे योगदान आहे आणि हे सर्व देखील या कुटुंबाचे सदस्य आहेत. महाविद्यालयाच्या विकासात आपल्या सर्वांचा मोलचा वाटा आहे. बदल घडवायचे असतील तर दूरदृष्टी असायला हवी, फक्त दूरदृष्टी च नाही तर ते अमलात कसे आणायचे, कृतीत कसे आणायचे ही सुद्धा ताकद मनुष्यात असायला हवी.

कोणतेही काम एकट्याने होत नसते, तर त्यासाठी टीम तयार करावी लागते. जीवाला जीव देणारी माणसे असली की, यश गाठणे सहज शक्य होते. कोणतेही काम करताना आपल्या पदाचा विचार न करता ती आपली जबाबदारी समजून काम केल्यास यश मिळवणे सहज शक्य होते.

समाजात असे अनेक लोक असतात की, आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो अशा उदात्त भावनेने, समाजाला काहीतरी द्यावे या विचाराने प्रवृत्त झालेले असतात. ही समाजव्यवस्था अशा लोकांच्या सहकार्याने चालू असते. श्रीमती गंगुताई धामणकर यासारख्या उदार व्यक्तिमत्वाची समाजाला गरज आहे. त्यांनी संस्थेला देणगी स्वरूपात मोलाचे सहकार्य करून एक आदर्श सर्वांपुढे ठेवला. अशाच लोकांमुळे संकुलाची वाढ होत असते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलेश कुलकर्णी आणि प्रा. सुहास धारणे यांनी केले. कार्यक्रमातील सर्व उपस्थितांचे आभार आय.क्यु.एस. सी. समन्वयक प्रा. डॉ. अमोल रासने यांनी मानले.

### आरोग्य दिन उत्साहात संपन्न

महाविद्यालयामध्ये जागतिक आरोग्य दिनानिमित्त चामरलेणी ट्रेक व हास्य क्लब उपक्रम ''वॉक फॉर हेल्थ'' आणि ''लाफ फॉर हेल्थ'' या अंतर्गत व्यवस्थापन विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी डॉ. सौ. सुषमा आर. दुगड, एम. डी, मास्टर ट्रेनर (हास्यरोग) व माजी अध्यक्ष महाराष्ट्र हास्यरोग संघ यांची उपस्थिती लाभली.

हास्य क्लब अंतर्गत - पूरक हालचाली, हास्ययोग, लायन हास्य व विविध प्रकारचे हास्य प्रकार घेण्यात आले. तसेच बिर्ला हॉस्पिटल व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचा १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. या उपक्रमांना शिक्षकांनीही उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमास कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन विभाग प्रमुख डॉ. एस.बी.जाधव, डॉ. एस्. एन्. दिवे, प्रा. एस्. व्ही. धारणे, प्रा. एस्. एम्. वाणी, प्रा. बी. आर. मिस्तरी, विद्यार्थी प्रतिनिधी तेजस चव्हाण, प्रीती फडोळ यांनी केले.

**महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी**

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक महात्मा फुले यांची जयंती कार्यवाह श्री. संजय नि. गुंजाळ आणि प्राचार्य प्रा. डॉ. एम्. व्ही. भालेराव यांच्या उपस्थितीमध्ये साजरी करण्यात आली. प्रथम महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. संदीप दराडे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात बोलतानी महात्मा ज्योतिबा फुले हे भारतातील एक महान समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ, लेखक आणि तत्त्वज्ञ होते. त्यांनी आयुष्यभर समाजात चालत असलेल्या भेदभाव आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिला आणि दलितांच्या हक्कांसाठी समर्पित केले. त्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. निवृत्ती डावखर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी कु. प्राजक्ता देवरे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी**

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एम्. व्ही. भालेराव यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमासाठी सर्व विभाग प्रमुख डॉ. सोनाली जाधव, डॉ. अमोल रासने, प्रा. सतीश भदाणे, प्रा. जगधीश कापडणीस, प्रा. संकेत चोरडिया, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एम्. व्ही. भालेराव यांनी आपल्या भाषणात बोलताना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि देशातील महान नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य भारतातील मागासवर्गीय, दलित, गरीब यांच्या उन्नतीसाठी खर्ची केले. ते एक प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ, न्यायशास्त्रज्ञ आणि राजकारणी होते. त्यांनी केवळ सामाजिक न्याय आणि सामाजिक विषमतेविरुद्ध लढा दिला, तसेच महिला सक्षमीकरणा साठीही बाबासाहेबांनी खूप काम केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. निवृत्ती डावखर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी ग्रंथपाल संदीप दराडे यांनी सर्वांचे आभार प्रदर्शन केले. ***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा ही विनंती.**
**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**
pvgsamachar@gmail.com
**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**प्र. प्राचार्य : श्री. शरद कोठावदे**

### मतदान जनजागृती कार्यक्रम (स्वीप)

मतदान जनजागृती कार्यक्रमांतर्गत विद्यालयात विविध उपक्रम राबविण्यात आले. यात निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पत्रलेखन स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून ग्रामस्थांना मतदान करण्याचे आवाहन केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रॅली काढून मतदान जनजागृती केली.

### खाऊच्या पैश्यातून ग्रंथालयास पुस्तके भेट

विद्यालयातील इ. ५वी अ च्या विद्यार्थ्यांनी आपल्याला मिळालेल्या खाऊच्या पैशातून रु. ७८५ किंमतीची ९ पुस्तके व इ. ७वी अ च्या विद्यार्थ्यांनी रुपये ५९५ किंमतीची ३ पुस्तके ग्रंथालयास भेट दिली. त्यांना वर्गशिक्षका श्रीमती संगीता कुंवर व सौ. सुषमा अमृतकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते ही पुस्तके ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्राचार्य श्री. शरद कोठावदे व श्री. संजय जोशी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

### प्रसिद्ध उद्योजकांची सदिच्छा भेट

दि.७ एप्रिल २०२४ रोजी प्रसिद्ध उद्योजक श्री. प्रविण सुराणा व श्री. राजेंद्र खिंवसरा यांनी विद्यालयास भेट दिली. संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते मान्यवरांचे शाल व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी अतिथींना विद्यालयात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, तसेच विविध सन्मानीय देणगीदारांच्या देणगीतून विद्यालयात निर्माण झालेल्या सुविधांची महिती संचालक श्री. अमोल जोशी यांनी दिली. शिष्यवृत्ती परीक्षा, विविध क्रीडा स्पर्धा यात विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उत्तुंग यशाबद्दल मान्यवरांनी आनंद व्यक्त केला. यावेळी ग्रंथालयात ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'चांद्रयान ३' हे हस्तलिखित बघून अतिथींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी ग्रंथालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची महिती ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी दिली. मान्यवरांनी संगणक कक्ष, प्रयोगशाळा यांची पाहणी केली. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था व विद्यालयाचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मत श्री. सुराणा व श्री. खिंवसरा यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्राचार्य श्री. शरद कोठावदे पर्यवेक्षक श्री. संजय जोशी उपस्थित होते.

### कै. दादासाहेब केतकर जयंती

दि. ९ एप्रिल २०२४ रोजी कुलगुरु कै. वि. गं. तथा दादासाहेब केतकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी कै. दादांचा जीवन प्रवास उलगडला. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या स्थापनेत दादांच्या बहुमोल योगदानाची महिती देत आदरांजली वाहिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले तर आभार श्रीमती संगिता कुंवर यांनी मानले.

### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त ग्रंथोत्सव

दि. १४ एप्रिल २०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त विद्यालयात ग्रंथोत्सव साजरा करण्यात आला. त्याचे उद्‌घाटन प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित विविध पुस्तकांचे अभिवाचन केले. ग्रंथोत्सवाचे संयोजन ग्रंथपाल

सौ. अर्चना गीत यांनी केले. यावेळी झालेल्या अभिवादन कार्यक्रमात प्राचार्य श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. उपशिक्षक श्री. सुरेश वाघमारे यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्याविषयी सविस्तर विश्लेषण केले. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी विद्यार्थ्यांना बाबासाहेबांसारखा आदर्श विद्यार्थी बनण्याचे आवाहन केले. यावेळी सर्व विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. प्रशांत सूर्यवंशी यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. लक्ष्मण चव्हाण यांनी मानले. ✻

## ✻ विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाळ (अं.), नाशिक ✻



खाऊच्या पैश्यातून ग्रंथालयास पुस्तके भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री संजय जोशी, वर्गशिक्षिका श्रीमती संगिता कुंवर, सौ. सुषमा अमृतकर व ग्रंथपाल सौ. अर्चना गीत





विद्यालयास सदिच्छा भेट प्रसंगी उद्योजक श्री. प्रविण सुराणा, श्री. राजेंद्र खिंवसरा यांच्यासमवेत संचालक श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी



ग्रंथोत्सवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी विविध पुस्तकांचे अभिवाचन करताना विद्यार्थिनी

# विद्याभवन-नेरुळ, नवी मुंबई शाखा

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**मराठी भाषा गौरव दिन**

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्याभवन शाळा, नेरुळ येथे ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, श्री. रमेश राऊत, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांनी संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत बहिणाबाई, झाशीची राणी लक्ष्मीबाई, जिजामाता, वासुदेव यांच्या वेशभूषा परिधान करुन आपली ओळख करुन दिली. महाराष्ट्रातील काही विशेष खाद्यपदार्थ जसे पुरणपोळी, झुणका-भाकर यांची ताटांमध्ये सजावट करुन मराठी खाद्य संस्कृती दर्शवली. श्रीमती अस्मिता सलगर यांनी मराठी भाषेचे अवयवांशी असलेले नाते म्हणजेच कंठ्य वर्ण, दंत्य वर्ण, ओष्ठ्यवर्ण, तालव्य वर्ण, इ. स्पष्ट केले. कवी कुसुमाग्रज यांच्या अथक प्रयत्नांमुळे मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून ओळखली जाऊ लागली, हे आपल्या भाषणातून सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिचा गोडवा, मराठी भाषेचे जगातील व भारतातील स्थान, भाषेची ओळख इ. आपल्या मनोगतातून व्यक्त केले. कुसुमाग्रज यांचे सुप्रसिद्ध नाटक नटसम्राट यातील काही प्रसंगांचे विद्यार्थ्यांनी नाट्यमय सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या अखेरीस ग्रंथदिंडी काढली. सोबतच विद्यार्थ्यांनी घोषणा देत मराठी भाषेचा जागर केला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती प्रतिभा कुमकर यांनी केले.

**गीत गायन स्पर्धा**

जागतिक महिला दिनानिमित्त आर. जे. मोशन पिक्चर यांच्यातर्फे अखिल भारतीय गीत गायन स्पर्धेचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. या स्पर्धेत शिक्षिका श्रीमती फरहाना चौगुले यांनी यश संपादन केले. पुढील फेरीसाठी त्यांची निवड झाली आहे.

**चित्रकला स्पर्धा**

श्रीमंत योगी प्रतिष्ठान, नेरुळ यांच्या तर्फे शिवजन्मोत्सवानिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या चित्रकला स्पर्धेत कु. सायली सुनिल भद्रीगे ३ री हिने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. तसेच कु. अथर्व पवार इ. ४थी याने नृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला.

**कराटे स्पर्धा**

ट्रॅडिशनल कराटे फेडरेशन यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये प्राथमिक इंग्रजी विभागाचा विद्यार्थी कु. आर्यन नागरगोजे (इ.२ री) याने ८ वर्षे वयोगटात काता या कराटे प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून सुवर्ण पदक पटकावले. तसेच १५ ते २० किलो वजनी गट व वयोमर्यादा ८ वर्षे असलेल्या गटामध्ये कुमिते या कराटे प्रकारात रौप्य पदक मिळवले. शिवाय विनर्स कराटे असोसिएशन यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या स्टेट लेव्हल कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत ८ वर्षे वयोमर्यादा असलेल्या गटामध्ये काता या कराटे प्रकारात सुवर्णपदक आणि कुमिते प्रकारात रौप्यपदक पटकावले.

**ऑलिम्पियाड स्पर्धा परीक्षा**

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या इंटरनॅशनल मॅथमॅटिक्स ऑलिम्पियाड स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी घवघवीत

यश संपादित केले.

| विद्यार्थ्याचे नाव | स्तर | क्रमांक |
|---|---|---|
| कु. प्रत्युष बाबाजी पडवळ | शालेय | प्रथम |
| कु. विराट तुषार घोरपडे | शालेय | तृतीय |
| कु. शौर्य महेश भोसले | शालेय | चतुर्थ |

या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले.

### चित्रकला स्पर्धा

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात कॅमल आर्ट कॉन्टेस्ट यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादित केले. या विद्यार्थ्यांना कॅमल ऑइल पेस्टल बॉक्स आणि फेविकॉल बॉटल बक्षीस स्वरूपात भेट देण्यात आली.

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | गट |
|---|---|---|
| कु. स्पंदन नवीन भगत | १ ली | ब |
| कु. अहिल आबेद शेख | २ री | ब |
| कु. दर्शन मनोज साहू | ३ री | क |
| कु. शुभ अरुण पवार | ४ थी | क |

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. श्रीजा बा. नायर**

### अभिनंदनीय वार्ता

पारिजात संस्था, मुंबई यांच्यातर्फे मराठी भाषा दिनानिमित्त 'गोष्ट मराठीची' ही शालेय विद्यार्थ्यांसाठी कथा अभिवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा मुंबई व पुणे या ठिकाणी दरवर्षी घेण्यात येते. मुंबईतील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे कीर्ती कॉलेज, दादर येथे ही स्पर्धा दि. २४ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली. या स्पर्धेत बृहन्मुंबई, वसई, विरार तसेच नवी मुंबईतील छोट्या गटातून ४८ शाळांमधील २१५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. विद्याभवन शैक्षणिक संकुल, नेरुळ शाखेतील माध्यमिक इंग्रजी व मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. पारिजात संस्थेचे सदस्य हर्षल ठाकरे, तेजस दडस, शिल्पा मॅडम तसेच परीक्षक स्वप्नील दळवी व निलेश मोरे या मान्यवरांच्या शुभहस्ते द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रक्कम रु. २०००/- विभागून देण्यात आली.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. अनघा अतुल भातमारे | ८ वी |
| कु. अग्रजा विलास जाधव | ८ वी |
| कु. प्रितीका अंकुश पारठे | ८ वी |
| कु. आर्या सागर नाक्ती | ८ वी |
| कु. तनुजा अर्जुन आहेर | ८ वी |

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा,नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### मराठी भाषा गौरव दिन

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून इ. ३ ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध भाषिक खेळांचे व भाषिक साहित्याचे प्रदर्शन सभागृहात भरविण्यात आले होते. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त थोर साहित्यिक कवी कुसुमाग्रज यांची जयंती दरवर्षी मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरी केली जाते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गोरख कदम तसेच मराठी विषय शिक्षिका श्रीमती राजकुमारी इंदलकर यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर सर्व मान्यवरांनी प्रदर्शनाची पाहणी करत विद्यार्थी निर्मित विविध भाषिक खेळ व साहित्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी या निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम जसे मराठीचे महात्म्य

सांगणारी गाणी, भाषणे व नृत्य सादर केले. इयत्ता ६ वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या माझा शब्दकोश या स्वनिर्मित्त पुस्तकाचे अनावरण कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी केले. या पुस्तकात विद्यार्थ्यांनी मराठीच्या पाठ्यपुस्तकातील पाठ व कविता यांच्या शब्दार्थांचे लेखन केले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर ग्रंथ दिंडी काढण्यात आली. या दिंडीतून विद्यार्थ्यांनी वाचनाचे व मराठी भाषेचे महत्त्व सांगितले. इ. ३रीच्या वर्गाची व्हीबी ॲपचा वापर करुन ऑनलाईन तसेच वर्गात समूहामध्ये प्रश्नमंजूषा घेण्यात आली. अशा विविध कार्यक्रमांनी मराठी भाषा गौरव दिन साजरा केला.

### केंद्रस्तरीय प्रश्नमंजूषा

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी नवी मुंबई महानगर पालिका आयोजित अमृत महोत्सवी भारतीय संविधानाच्या प्रश्न मंजूषा स्पर्धेसाठी शिक्षिका श्रीमती कविता विनय तेंडुलकर यांची केंद्रस्तरीय परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार दि. २७ फेब्रुवारी रोजी नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९ येथे त्यांनी परीक्षक म्हणून काम केले.

### राष्ट्रीय विज्ञान दिवस

दि. २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून भारतीय शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकटरामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. रामन इफेक्टचा शोध लागल्यानंतर या शोधाची घोषणा त्यांनी दि. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली. त्यामुळेच २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त विद्याभवन संकुलात विज्ञान दिन, विज्ञान प्रदर्शन व विज्ञान प्रश्नमंजूषा आयोजित करुन हा दिन साजरा करण्यात आला. इ. ३ री ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित प्रकल्प मांडले होते. त्या प्रोजेक्टचे मान्यवरांनी परीक्षण केले. माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गोरख कदम, प्राध्यापक श्री. विठ्ठल मोरे, विज्ञान शिक्षक श्री. दत्तात्रय आटपाडकर यांना परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. देणगीदार व हितचिंतक श्री. के. एल मोदी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी श्री. के. एल. मोदी यांच्यासह विज्ञान प्रदर्शनास भेट दिली व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सभागृहात इ. ४थी ते ७वीच्या विद्यार्थ्यांची प्रश्नमंजूषा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना विज्ञान दिनाचे व विज्ञानाचे महत्त्व सांगण्यात आले.

### खाजगी शाळा गटातून नवी मुंबई मधून 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियानात विद्याभवन प्राथमिक मराठीचे सुयश

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना अंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' हे अभियान राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकरीता राबविण्यात आले होते. आपल्यासाठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट म्हणजे या अभियानात प्राथमिक मराठी विभागाने केंद्र स्तरावर प्रथम, तालुका स्तरावर प्रथम तर ठाणे जिल्ह्यातून तृतीय क्रमांक पटकाविला आहे. **शाळेला जिल्हास्तरावरील तृतीय क्रमांकाचे ३ लक्ष रुपयांचे पारितोषिक प्राप्त झाले**. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, यांच्या मार्गदर्शनामुळे तसेच सर्व शिक्षक पालक, शिक्षकेतर कर्मचारी व सफाई कर्मचारी यांच्या सहकार्यामुळेच विद्याभवनच्या शिरपेचात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला.

### नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग, केंद्रस्तरीय निपुणोत्सवात सहभाग

विद्यार्थ्यांच्या पायाभूत भाषा व गणित विषयक क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका शिक्षणाधिकारी श्रीमती अरुणा यादव यांच्या संकल्पनेतून निपुणोत्सव मेळाव्याचे आयोजन केंद्रस्तरावर नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९, नेरुळ येथे दि. ६ मार्च २०२४ रोजी करण्यात आले. या निपुणोत्सवात बेलापूर गटातील १५ शाळांच्या प्रत्येकी दोन विद्यार्थी व एक शिक्षक यांनी सहभाग घेतला. योगासने व खेळांचे महत्त्व, माझी पोषण थाळी, भाषा व

गणित विषयक खेळ, वाचन कोपरा या विषयांशी संबंधित माहितीचे, खेळांचे स्टॉल मांडले होते. या निपुणोत्सवातून विद्यार्थ्यांनी भाषा व गणित विषयाचे ज्ञान आत्मसात केले, तसेच आरोग्याचे, खेळांचे व आहाराचे महत्त्व जाणून घेतले. प्राथमिक मराठी विभागातून विद्यार्थी कु. विहान पडवळ इ. ४थी व विद्यार्थिनी कु. तनिशा इंदलकर इ. ७ वी या दोघांनी भाषा समृद्धी खेळांचे सादरीकरण केले. या निपुणोत्सवात मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी विद्यार्थ्यांनी मांडलेल्या विविध खेळांचे व त्यातून मिळणाऱ्या ज्ञानाचे कौतुक केले.

## सृजन DIPEX २०२४ क्षेत्रभेट

दि. ८ मार्च २०२४ रोजी इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी तेरणा इंजिनियरिंग कॉलेज, नेरुळ या ठिकाणी क्षेत्रभेट दिली. सृजन संस्थेतर्फे **DIPEX** २०२४ आयोजित प्रदर्शन भरविण्यात आले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जवळपास २००० प्रतिकृती मांडण्यात आल्या होत्या. भारत देशाचे भविष्य उज्वल असावे यादृष्टीने विद्यार्थ्यांनी कृतिशील व प्रयोगशील व्हावे यासाठी संस्थेने एक मोठे व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. शेती, आरोग्य, विज्ञान, तंत्रज्ञान, सौरऊर्जा, पाणी यांसारख्या अनेक विषयांवर विद्यार्थ्यांनी स्वत:ची कल्पकता वापरुन खूप सुंदर प्रोजेक्ट बनवले होते. इ. ७वीच्या विद्यार्थ्यांनी या प्रकल्पांची पाहणी करुन त्याबद्दल अधिक माहिती मिळवली.

## संस्कार दिन

ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व कै. डॉ. शंकर पांडुरंग किंजवडेकर यांचा जन्मदिवस संस्कार दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. दि. १० मार्च २०२४ रोजी विद्याभवन संकुलाच्या सभागृहात कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, श्री. डॉ. किंजवडेकर यांच्या कन्या श्रीमती तेजस्विनी अधिकारी, इ. मान्यवरांच्या हस्ते डॉक्टरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. समाजसेविका श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांनी शाळेचे नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी कौतुक केले. बी. ए. आर. सी. चे निवृत्त वैज्ञानिक श्री. के. एल. मोदी यांनी संस्कारांची आवश्यकता, प्रकार, उपयोग स्पष्ट करताना दैनंदिन जीवनातील विविध उदाहरणे दिली. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी कै. डॉ. शं. पां. किंजवडेकर यांच्या नेतृत्व कर्तृत्व व दातृत्व या गुणांविषयी माहिती दिली. विद्यार्थिनी कु. उल्का झगडे, कु. मानवी गुळवे, कु. दीक्षा आहेर व माजी विद्यार्थिनी कु. नीलम तरकसबंद यांनी संस्कारांचे महत्त्व सांगत आपले मनोगत व्यक्त केले. या संस्कार दिनाचे औचित्य साधून पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित श. गो. केतकर हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना तसेच महिला दिनानिमित्ताने आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या माता पालकांना, तसेच आदर्श पालक श्रीमती सुनिता पाटील व श्रीमती वैशाली शेळके यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. डॉ. शं. पां. किंजवडेकर मेमोरियल फाउंडेशनकडून होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास सर्व विभागांचे मुख्याध्यापक, समन्वयक, पर्यवेक्षक व शिक्षक उपस्थित होते.

## महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा सुयश

२८ जानेवारी २०२४ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षेत विद्याभवन प्राथमिक मराठी विभागाच्या खालील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | गुण २०० पैकी | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. विभूती गुंजाळ | ६वी | १७२ | केंद्रात प्रथम राज्यात तृतीय |
| कु. काव्या जाधव | २री | १३८ | केंद्रात द्वितीय राज्यात २३ वी |
| कु. आरुष कानवडे | ३री | ११२ | केंद्रात तृतीय राज्यात ३४ वा |
| कु. अर्णव ढाळे | ३री | १०८ | केंद्रात पाचवा राज्यात ३६ वा |

| | | | |
|---|---|---|---|
| कु. श्रीकृष्णा आटपाडकर | ४थी | १३२ | केंद्रात प्रथम राज्यात २३ वा |
| कु. अनिक पिसे | ४थी | १२४ | केंद्रात तृतीय राज्यात २७ वा |
| कु. विहान पडवळ | ४थी | १२४ | केंद्रात तृतीय राज्यात २७ वा |
| कु. श्रवण गंधाक्ते | ७वी | ११८ | केंद्रात प्रथम राज्यात ३१ वा |

**सर्व यशस्वी शिक्षक, विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक व पालक यांचे शाळेच्या व संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!** ***

# शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. सुरेश पाटील**

### कॅम्पस् इंटरव्ह्यू

दि. २४ मार्च २०२४ रोजी महाविद्यालयात कॅम्पस् इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात आले होते. ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल, दिंडोरी, नाशिक यांच्यातर्फे इंटरव्ह्यू घेण्यात आले. यावेळी विज्ञान, गणित, मराठी, इंग्रजी, हिंदी या विषयांसाठी विश्वास भालेराव, अपेक्षा रकिबे, कांचन वडजे, रीना पुराणिक, सोनल बोरसे, उषा आहेर, स्वाती मेतकर, शुभम खांदवे, ऋतुजा गीते, श्रेया शिंदे, शरयू पाटील, साधना मेतकर, प्रांजल पाटील, नम्रता घुंद्रे, वैशाली शेवाळे हे विद्यार्थी-शिक्षक इंटरव्ह्यूसाठी उपस्थित होते. यावेळी ग्लोबल इंटरनॅशनल स्कूलचे चेअरमन श्री. केन आणि त्यांचे दोन सहकारी उपस्थित होते.

### महात्मा फुले जयंती साजरी

दि. १० एप्रिल २०२४ रोजी महाविद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यांनतर सर्व प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी-शिक्षिका प्रिती पगारे हिने केले व विद्यार्थी-शिक्षक अजय पाखले याने उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन प्रा. धर्मेंद्र जोपळे यांनी केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

दि. १३ एप्रिल २०२४ रोजी महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. प्राध्यापक डॉ. अरविंद जिंजर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. त्यानंतर सर्व प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी अभिवादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विद्यार्थी-शिक्षक मयूर चौधरी याने केले. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन प्रा. धर्मेंद्र जोपळे यांनी केले. *

*** शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक ***



**ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल, दिंडोरी, नाशिक यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पस् इंटरव्ह्यू मध्ये इंटरव्ह्यू देताना विद्यार्थिनी**

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग**

**आरोग्य तपासणी**

दि. २७ मार्च २०२४ ते १ एप्रिल २०२४ या कालावधीत प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

दि. ४ एप्रिल २०२४ रोजी सर्व विद्यार्थ्यांसाठी आणि ५ एप्रिल २०२४ रोजी प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयाच्या सभागृहात 'नवोदित अभियंत्यांची आरोग्य जागृती' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या सत्राचे संचालन डॉ. श्रीमती जे. पी. महाजन आणि डॉ. स्वाती जगताप यांनी केले.

दि. ३ एप्रिल २०२४ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी, 'जल प्रतिज्ञा' आणि 'पावसाचे पाणी साठवण प्रणाली' भेट देण्यात आली.

**आर्टिफिशल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभाग**

नवीन वर्षात, विभागामध्ये विविध व्याख्याने आयोजित करण्यात आली. 'इन्टरनेट ऑफ थिंग्स' या विषयावर द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प सादर करून स्पर्धेत भाग घेतला व बक्षीसे मिळवली.

तृतीय वर्षासाठी ''क्लाऊड कॉम्पुटिंग'' व द्वितीय वर्षासाठी ''इन्फॉर्मशन सिस्टिम्स्'' अशी आंतर विभागीय कार्यशाळा व सेमिनारसुद्धा यशस्वी रित्या पार पडला. ''योगा आणि मेडिटेशन'' हा ऑडिट कोर्स पुणे विद्यार्थी गृहाच्या जिमन्यॅशियम, तळजाई टेकडी व पु ल देशपांडे उद्यान या ठिकाणी यशस्वीरित्या पार पाडला.

तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''How to convert Jupyter Notebook into a Product '' या वर ABB या प्रसिद्ध कंपनीमधल्या इंजिनिअरची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी त्यांच्याशी 'डेटा सायन्स' या विषयावर सुद्धा मनमोकळा संवाद साधला.

**इलेक्ट्रिक्ल इंजिनिअरिंग विभाग**

**''ट्रान्सफॉर्मर डिझाइन'' वर कार्यशाळा**

दि. ४ ते ८ फेब्रुवारी २०२४ EESA ने द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''मशीन डिझाईन कार्यशाळा'' आयोजित केली होती. मशीन डिझाईन तज्ज्ञ श्री. विशाल ताठे यांनी कार्यशाळेचे संचालन केले. कार्यशाळेत द्वितीय वर्षाचे २४ विद्यार्थी आणि तृतीय वर्षाचे ३९ विद्यार्थी असे एकूण ७५ विद्यार्थी उपस्थित होते.

**''प्लेसमेंट कसे क्रॅक करावे'' या विषयावर ओरिएंटेशन सत्र**

डॉ. नरेश जैस्वाल, टीपीओ, यांनी ९ फेब्रुवारी २०२४ रोजी विद्यार्थ्यांना प्लेसमेंट सराव, तयारी याबद्दल मार्गदर्शन केले. या व्यतिरिक्त कॅम्पसमध्ये बीई इलेक्ट्रिकलचे विद्यार्थी, कु. विक्रांत गुजर, कु. माधव पित्रे, कु. अवधूत मनगवे, कु. उमेश उमराणी, कु. वैष्णवी शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या विविध तंत्रांवर मार्गदर्शन केले.

**''उद्योगात ऑटोमेशन म्हणून इलेक्ट्रॉनिक्सची गरज'' या विषयावर अतिथी सत्र**

दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजी इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभाग आणि 'इलेक्ट्रॉनिक्स स्टडी सेंटर', नाशिकचे श्री. संजय चौधरी यांच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''उद्योगात ऑटोमेशन म्हणून इलेक्ट्रॉनिक्सची गरज'' या विषयावर तज्ज्ञ सत्राचे आयोजन केले होते.

**''इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगद्वारे करिअरची उद्दिष्टे स्थापित करणे'' या विषयावरील अतिथी सत्र**

दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी द्वितीय वर्ष

इलेक्ट्रिकलच्या विद्यार्थ्यांसाठी ''इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीद्वारे करिअरची उद्दिष्टे स्थापित करणे'' या विषयावर माजी विद्यार्थी श्री. नरेंद्र गोसावी, महाव्यवस्थापक TNBI ऑटोमेशन लिमिटेड पुणे यांच्या मदतीने अतिथी व्याख्यान आयोजित केले होते.

### 'Ansys सॉफ्टवेअर' वर कार्यशाळेचे आयोजन

इलेक्ट्रिकल विभागाने एआरके इन्फोसोल्युशन्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने टीई इलेक्ट्रिकलच्या विद्यार्थ्यांसाठी ''ॲप्लिकेशन ऑफ Ansys Maxwell सॉफ्टवेअर इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग'' या विषयावर तीन दिवसीय (२८ फेब्रुवारी ते १ मार्च २०२४) हँड्स ऑन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. प्रशिक्षण कार्यक्रमाचे संसाधन व्यक्ती डॉ. कार्तिकेश झा, एआरके इन्फोसोल्युशन्स लि. चे डॉ. अजयशेखर रेड्डी, एआरके इन्फोसोल्युशन्स लि. चे श्री. मंदार कुलकर्णी, बेलराईझ इंडस्ट्रीज लि. च्या कु. रसिका आढाव (प्राउड माजी विद्यार्थी), बेलराईझ इंडस्ट्रीज लि. चे डॉ. एम. पी. भवाळकर, प्रा. एस्. एच्. यमला यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले

### ''तणाव व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य'' या विषयावर अतिथी सत्र

इलेक्ट्रिकल विभागाने प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''तणाव व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य'' या विषयावर विद्यार्थी समुपदेशक डॉ. रेषा अभ्यंकर यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

### कोकण रेल्वेसोबत सामंजस्य करार

इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागाने दि. १४ मार्च २०२४ रोजी कोकण रेल्वेसोबत सामंजस्य करार केला. कोकण रेल्वे आणि पीव्हीजीचे सीओईटी जीकेपी-आयओएम मधील या सामंजस्य करारामध्ये सहयोगी संशोधन, विद्याशाखा विकास, विद्यार्थी आणि प्राध्यापकांची देवाणघेवाण, अभ्यासक्रम इनपुट, इंटर्नशिप, अतिथी प्रकल्प, प्रशिक्षण, उद्योग भेटी यांचा समावेश आहे.

## ई ॲण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

❋ डीएसपी- IIT बॉम्बे बॅच -६ TE (E & TC) विद्यार्थ्यांचे इंटर्नशिप मूल्यांकन, प्रा. डॉ. विक्रम गद्रे, EE विभाग, IIT बॉम्बे आणि श्री. नितिन लक्ष्मीशा, IIT बॉम्बे यांनी १७ एप्रिल २०२४ रोजी केले. संचालक प्रा. राजेंद्र कडूसकर यांनी डॉ. गद्रे आणि श्री. नितीन यांचा सत्कार केला आणि विद्यार्थ्यांना संबोधित केले. डॉ. विक्रम गद्रे, IIT बॉम्बे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले आणि ४२ विद्यार्थ्यांना इंटर्नशिप ऑफर केली आहे.

ऑक्टोबर २०२० पासून, तृतीय वर्षातील सर्व १७८ विद्यार्थ्यांनी प्रा. तनुजा खटावकर, प्रा. एम. पी. पोतदार आणि डॉ. एम. पी. अत्रे या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली सहा महिन्यांची इंटर्नशिप पूर्ण केली आहे.

दि. १९ एप्रिल २०२४ रोजी, तोलानी मेरीटाईम इन्स्टिट्यूटच्या प्राचार्य आणि प्राध्यापक, PVG आणि TMI यांच्यात सामंजस्य करार अंतर्गत केलेल्या ''सहयोगी प्रकल्पांची'' स्थिती मूल्यांकन करण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी महाविद्यालयाला भेट दिली. ई आणि टीसी (२ गट), मेकॅनिकल (२ गट), संगणक (१ गट) आणि इलेक्ट्रिकल (१ गट) अशा विविध विभागांमधील सर्व ६ गटांनी ''सहयोगी प्रकल्पांवर'' काम केले आणि त्यांचे कार्य सादर केले. संचालक श्री. सुनिल रेडेकर यांनी डॉ. संजीत कानूनगो, प्राचार्य TMI, डॉ. सागर माने देशमुख, प्रमुख संशोधन आणि सल्लागार आणि TMI मधील इतर ५ प्राध्यापकांना आमंत्रित केले आणि त्यांचा सत्कार केला.

प्रा. तनुजा खटावकर, SPOC, आणि महाविद्यालयामधील प्राध्यापक समन्वयकांनी TMI टीमसह विद्यार्थ्यांच्या प्रकल्प कार्याचे मूल्यमापन केले आणि विद्यार्थ्यांच्या योगदानाचे कौतुक केले. प्रा. खटावकर, डॉ. भवळकर, प्रा. कांबळे, प्रा. कलशेट्टी यांनी प्रकल्पाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**लक्ष क्लबतर्फे करियर मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन**

दि. ८ एप्रिल २०२४ रोजी महाविद्यालयाच्या 'लक्ष क्लब' ने करियर मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनेने झाली. या प्रसंगी सीनिअर आयपीएस ऑफिसर ए. एस. राजन प्रमुख व्याख्याते होते. तसेच युनायटेड किंगडम येथे स्थित प्रथितयश व्यावसायिक श्री. तेजिंदर सिंग शेखोन आणि श्री. अशोक हर्ष, पुणे विद्यार्थी गृहाच्या नियामक मंडळाच्या सदस्या मा. श्रीमती पूर्णिमा लिखिते, आणि ॲडव्होकेट श्री. सिध्दार्थ लिखिते उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांचे संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी स्वागत केले. प्रमुख अतिथी श्री. ए. एस. राजन यांनी विद्यार्थ्यांना 'विविध क्षेत्रातील करियर ची संधी' याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. आयुष्यात सर्वात आधी लक्ष्य ठरवून त्या दिशेने आपले प्रयत्न केले पाहिजेत असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. या व्याख्यानासाठी विद्यार्थी आणि महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली. प्रा. सौ प्रिया देशपांडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

**मुद्रण अभियांत्रिकी विभाग**

मुद्रण तंत्रज्ञान विभागाने एप्रिल २०२४ मध्ये ५ प्रमुख कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दि. १ एप्रिल २०२४ रोजी इलेक्ट्रॉनिक सर्किटच्या निर्मितीवर ''Future of Flexible Electronics'' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा मुद्रण तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स विभागांनी हायब्रीड मोडमध्ये आयोजित केली होती. पहिला कार्यक्रम मुद्रित इलेक्ट्रॉनिक्स वर (Printed Electronics) Workshop हा होता. प्रोटोलॅब्स, मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय मेहता हे प्रमुख पाहुणे होते. तसेच आयआयटी, कानपूरचे प्रा. देवेंद्र मौर्य हे सन्माननीय अतिथी होते. इतर प्रतिष्ठित वक्ते विविध उद्योग आणि मुद्रित इलेक्ट्रॉनिक्समधील नामांकित संस्थांमधील होते. उद्घाटनासाठी संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर व प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारंबळे उपस्थित होते व त्यांनी भविष्यातील ॲप्लिकेशन्स साठी प्रिंटेड इलेक्ट्रॉनिक्सचे महत्त्व विशद केले.

Print ERA २४ आणि Pack2gen, राष्ट्रीय स्तरावरील Students Event ४ आणि ५ मे २०२४ रोजी आयोजित करण्यात आली होती. दोन दिवसांच्या या उपक्रमाचे मुद्रण तंत्रज्ञान विभागाने राष्ट्रीय स्तरावर आयोजन केले होते. अण्णा विद्यापीठ, गिंडी, कालिकत अशी विविध महाविद्यालये, युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. ४ एप्रिल रोजी झालेल्या उद्घाटन समारंभात १० वाजता प्रिंटेरा २४ ची सुरुवात झाली. संचालक श्री. सुनील रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, प्रा. सौ. मधुरा महाजन, श्री. एस. दयाकर रेड्डी, साई उद्योगातील दिग्गज एंटरप्रायझेस, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशाचे श्रेय त्याचे शिर्षक प्रायोजक Bindwel PPOA चे टी-शर्ट, प्रायोजक श्री. राहुल मारुलकर आणि व्हिजनरी व्हेंचर्स इव्हेंट प्रायोजक मोनेडा टेक्नॉलॉजीज् हे होते. युनिक लेबल्स प्रा. लि., नारा इन्फिनिटी प्रा. लि. चे उद्घाटन झाले. मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. समापन कार्यासाठी प्रमुख अतिथी एव्हरी डेनिसनचे श्री. रवी शिंदे आपल्या महाविद्यालयाचे प्रिंटिंग विभागाचे माजी विद्यार्थी यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या हस्ते पारितोषिक विजेत्यांना प्रमाणपत्रे व पारितोषिके देण्यात आली.

दि. १६ एप्रिल रोजी महाविद्यालयाने राष्ट्रीय स्तरावर प्रथमच National Conference on Food Packaging चे आयोजन केले. यामध्ये विविध संस्था आणि राज्यातील विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी झाले होते. सादरकर्ते आणि उपस्थित विविध उद्योग व्यावसायिक, तज्ज्ञ अभ्यासक यांचा हा वैविध्यपूर्ण मेळावा होता. ही परिषद फूड पॅकेजिंग क्षेत्रातील नवीनतम ट्रेंड, प्रगती आणि आव्हाने

शोधण्यासाठी आणि चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी संचालक श्री. सुनिल रेडेकर तसेच प्रो. मधुरा महाजन एच. ओ. डी. प्रिंटिंग आणि डॉ. मनमोहन भूमकर, प्रिन्सिपल इनचार्ज उपस्थित होते. कॉन्फरन्स चे प्रायोजक चितळे बंधू मिठाईवाले हे होते. कॉन्फरन्स कोऑर्डिनेटर प्रो. पद्मजा जोशी होत्या.

**'प्रिंटिंग टेक्नॉलॉजी' अभ्यासक्रमाचे नामकरण 'प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग'**

मुद्रण व्यवसायामध्ये होत असलेली वाढ आणि विस्तार लक्षात घेता मुद्रणाबरोबरच पॅकेजिंग या विषयालाही महत्त्व प्राप्त होत आहे. त्यादृष्टीने वाढत असलेला व्यवसाय आणि पॅकेजिंगच्या क्षेत्रामध्ये असलेल्या व्यवसायाच्या संधी आणि त्यासाठी लागणारे मनुष्यबळ विचारात घेऊन संस्थेने 'प्रिंटिंग टेक्नॉलॉजी' या अभ्यासक्रमाचे नाव बदलून 'प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग' असे करण्याचा प्रस्ताव शासनाकडे, विद्यापीठाकडे आणि एआयसीटीईकडे सादर केला होता. त्यास या सर्व विभागांकडून मान्यता देण्यात आली असून येत्या शैक्षणिक वर्षापासून सदर विभागाचे व अभ्यासक्रमाचे नाव प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग असे संबोधले जाणार आहे. पॅकेजिंगसाठी आवश्यक असणारी यंत्रसामुग्री महाविद्यालयाने खरेदी केलेली आहे.

मुद्रण अभ्यासक्रमाच्या बदलत्या अभ्यासक्रमा - नुसार आणि व्यवसायातील विविध संधी ओळखून संस्थेने मुद्रण विभागातील क्लासरुम अद्ययावत् करुन घेतल्या आहेत. त्यामध्ये पारंपरिक खडू-फळ्याऐवजी डिजिटल बोर्ड्स बसविण्यात आले आहेत. केवळ मुद्रण अभियांत्रिकीचे वर्ग प्रायोगिक तत्त्वावर नूतनीकरण करुन सर्वच वर्गांमध्ये इंटरॅक्टिव्ह बोर्ड्स बसवून तेथे इंटरनेटची सुविधाही देण्यात आली आहे. शिवाय संगणाकाची एक प्रयोगशाळाही अद्ययावत करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या विकासासाठी या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रयोग शाळेचा उपयोग होणार आहे. ***

## श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ** **प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

**मधुमक्षिका पालन अभ्यासक्रम**

महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभाग आणि खादी ग्रामोद्योग यांच्या संयुक्त विद्यमाने एक महिन्याचा मधुमक्षिका पालन शिष्यवृत्ती अभ्यासक्रम महाविद्यालयात राबविण्यात आला. या अभ्यास-क्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मधुमक्षिकापालनाचे प्रशिक्षण देण्यात येऊन खादी ग्रामोद्योग यांच्याकडून सहभागी विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी दीड हजार रुपये एवढी शिष्यवृत्ती देखील देण्यात आली. प्रशिक्षणाची जबाबदारी सुप्रकृती मधु शाळेचे संचालक प्रा. डॉ. टी. बी. निकम आणि त्यांचे सहकारी ऋषिकेश पवार यांनी पार पडली. या अभ्यासक्रमाची सांगता २८ मार्च रोजी महाविद्यालयात सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ उपस्थित होते. नाशिक येथील खादी ग्रामउद्योग विभागाचे अधीक्षक श्री. ए. बी. वाघ, सहा. संचालक एन्. एम्. खताळ, आणि श्री. पी. ए. वाघमोडे हे उपस्थित होते. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे यांचे मार्गदर्शन लाभले. शिवाय या अभ्यासक्रमासाठी प्राणिशास्त्र विभाग प्रमुख प्रा. धन्वंतरी देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. योगिता काकड यांनी केले. प्रा. सोनल बोरसे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाप्रसंगी सर्व विभाग प्रमुख सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. **

## ※ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ ※



आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दिघी येथे 'PACE २०२४' क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या महिला बॅडमिंटन संघाच्या विद्यार्थिनी कु. श्रती कुंभार तृतीय वर्ष ई ॲण्ड टी सी आणि कु. अन्वी कोरे, द्वितीय वर्ष एआयडीएस यांचे अभिनंदन करताना संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर प्र. प्राचार्य मनोज तारांबळे आणि शारीरिक शिक्षण प्राध्यापक श्री. नामदेव बन्ने



दि. १४ मार्च २०२४ रोजी कोकण रेल्वेसोबत सामंजस्य करार प्रसंगी कोकण रेल्वेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य मनोज तारांबळे, प्रा. डॉ. मंगेश ठकार

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ※



गुढीपाडवा सण उत्साहात साजरा करताना पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या विद्यार्थिनी

# पंचवटी शाखा, नाशिक

## संचालक : श्री. अमोल म. जोशी

### श्री रामदास नवमी उत्साहात साजरी

दि. ५ मार्च २०२४ रोजी श्री रामदास नवमी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून लाभलेल्या सौ. सुवर्णाताई महाबळ यांच्या हस्ते श्री रामदास स्वामींच्या मुर्तीची पूजा करण्यात आली. सौ. सुवर्णाताई महाबळ यांचा सत्कार श्री. सूर्यवंशी यांच्या हस्ते गुलाबपुष्प आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. या कार्यक्रमास सर्व आश्रमस्थ विद्यार्थी व संस्था सेवक उपस्थित होते.

सौ. सुवर्णाताई महाबळ यांनी श्री रामदास स्वामींच्या जीवनाविषयक छान माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. तसेच विद्यार्थ्यांचे कर्तव्य, सुंदर दिनचर्या यांमुळे होणारे जीवनातील फायदे याचे वर्णन केले. सौ. सुवर्णाताई महाबळ या गेल्या १५ वर्षांपासून नाशिक शाखेत स्वामींच्या जयंती उत्सवासाठी नियमितपणे येत असतात.

